# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

**सभा क्र. ३६ //स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त// (ऑनलाईन अॅपव्दारे) दिनांक : ३०/०९/२०२०**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि.३०/०९/२०२० बुधवार रोजी दुपारी ०३.०० वाजता जळगांव शहर महानगरपालिकेच्या सरदार वल्लभभाई पटेल टॉवर प्रशासकीय इमारतीमधील २ ऱ्या मजल्यावरील सभागृहात मा.उपसचिव, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील पत्र क्र.कोरोना-२०२०/प्र.क्र.७६/ नवि-१४ दि.३ जुलै २०२० अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडीओ कॉन्फरन्सिंग व्दारे) स्थायी समिती सभापती अॅड. हाडा शुचिता अतुलसिंह यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी ऑनलाईन पध्दतीने खालील मा.सदस्य सभेस उपस्थित होते.

**मा.अॅड. हाडा शुचिता अतुलसिंह सभापती तथा पिठासीन अधिकारी**

| | |
|---|---|
| पोकळे दिलीप बबनराव | देशमुख प्रतिभा गजानन |
| खडके सुनिल वामनराव | लढढा नितीन बालमुकुंद |
| कोल्हे प्रविण रामदास | भंगाळे विष्णु रामदास |
| सनकत चेतन गणेश | बरडे नितीन मनोहर |
| दारकुंडे नवनाथ विश्वनाथ | शेख सैईदा युसुफ |
| पाटील राजेंद्र झिपरु | |

सदर सभेस मा.आयुक्त, श्री.सतिश कुलकर्णी,उपायुक्त,श्री.किरण देशमुख,उपायुक्त, प्रशांत पाटील, मुख्यलेखाधिकारी, श्री.कपिल पवार , सहा.आयुक्त .श्री.पवन पाटील व श्री.सुनिल गोराणे, नगरसचिव उपस्थित होते.

**वंदेमातरमने सभेला सुरुवात करण्यात आली.**

**मा.सभापती :-** नगरसचिव यांनी सभेच्या कामकाजाला सुरुवात करावी.

**नगरसचिव :-** आजच्या सभेत सन्मा.सदस्य श्री. भगतराम रावलमल बालाणी तसेच सन्मा.सदस्य सदाशिव गणपत ढेकळे यांचे रजेचे अर्ज प्राप्त झालेले असुन ते मा.सभापती यांनी मंजुर केलेले आहेत.

**श्री.राजेंद्र पाटील :-** माईक बंद करण्याच्या सुचना करण्यात याव्यात.

**नगरसचिव :-** सर्व सन्मा.सदस्यांना विनंती आहे कृपया माईक बंद ठेवावे. विषय पत्रिकेवरील विषयांना सुरूवात करण्यात येत आहे.

**नगरसचिव :- विषय क्र. १:-** दि.२५/०८/२०२० व १५/०९/२०२० रोजी संपन्न झालेल्या ऑनलाईन स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**मा.सभापती :-** बोला नवनाथभाऊ , बोला नवनाथ भाऊ आवाज येत नाहीये का सदस्यांना , आवाज येतो आहे का.

**नगरसचिव :-** आवाज येतोय का आदरणीय भाऊ

**मा.सभापती :-** बोला नवनाथभाऊ , नवनाथभाऊ माईक ऑन करा.

**नगरसचिव :-** विषय क्रं. १

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** आवाज तुटतोय , हॅलो , हॅलो

**नगरसचिव :-** हो बोला ना

**मा.सभापती :-** बोला नवनाथभाऊ

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** आवाज येत नाहीये , हॅलो

**मा.सभापती :-** बोला नवनाथभाऊ आम्हाला तुमचा आवाज येतोय बोला.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** आवाज येत नाहीये , हॅलो मान्य करण्यात यावे.

**नगरसचिव :-** सुचक , अनुमोदक

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अनुमोदक कोण आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मंजुर करून घ्या ताई मंजुर करून घ्या आमची काहीच हरकत नाहीये ठिक आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. २८२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, दि.२५/०८/२०२० व १५/०९/२०२० रोजी संपन्न झालेल्या ऑनलाईन स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त कायम करणेस मान्यता प्रदान करणेत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १२ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**अनुमोदक :- पोकळे दिलीप बबनराव**

**नगरसचिव :- विषय क्र. २:-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेणे.

१.प्रशासकीय आदेश क्रं./विदयुत/२६ दि.१६/०९/२०२० मा.आ.श्री.चंदुभाई पटेल विपस यांचे आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन २०१९-२० अंतर्गत विदयुत विभाग यु.क्र.१ अंतर्गत पटेलवाडी शिवाजीनगर येथे १, मुक्ताईनगर दत्तगार्डन येथे ४, असे एकुण ५, विदयुत विभाग यु.क्र.२ अंतर्गत वार्ड क्रं.१६ मधील वर्षा कॉलनी दत्त मंदिरा समोर श्री.नेहते यांच्या घराजवळ १ व श्री.गणेश राणे, गणेशवाडी यांच्या घरासमोर १ असे एकुण २, विदयुत विभाग यु.क्र.४ अंतर्गत शिवराम नगर येथील आनंद हौसींग सोसायटी येथे १ व पार्वतीनगर ओपन स्पेस येथे १ असे एकुण २ अश्या विविध ठिकाणी एकुण ०९ नग सोलर स्ट्रीट लाईन (दोन पॅनल) उभारुन लाईट व्यवस्था करणे. कामी मक्तेदार भुषण इलेक्ट्रीकल्स,जळगांव यांचे अंदाजीत रक्कमेइतकेचेच दर स्विकारुन रक्कम रु.५९५१६४/- मात्र खर्चाची संविदा.

**श्री. नितीन बरडे :-** सभापती ताई हॅलो

**मा.सभापती :-** बोला नितीनभाऊ बोला

**श्री.राजेंद्र पाटील :-** प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

**श्री. नितीन बरडे :-** सभापती ताई , आयुक्त साहेब

**मा.सभापती :-** बोला नितीनभाऊ बरडे बोला

**श्री. नितीन बरडे :-** हॅलो , आयुक्त साहेब आपण हे जे लाईट बसवतो आहे आपण तीन महिन्याच्यानंतर हे लाईटं बंद पडले याची दुरूस्तीची व्यवस्था काय आहे आपल्याकडे .

**श्री.एस.एस.पाटील , विद्युत विभाग :-** हे जे लाईट आपण बसविता आहे हे सोलर लाईट ची पॉवर सिस्टिम जी आहे ते आपण मक्तेदाराकडून लावतो आहे त्याच्यावर ५ वर्षामध्ये जर समजा काही प्रॉब्लेम आला. तर त्याची दुरूस्ती करण्याची जबाबदारी संबंधित मक्तेदाराची राहणार आहे.

**श्री. नितीन बरडे :-** सभापती महोदय आवाज येत नाहीये.

**श्री.एस.एस.पाटील , विद्युत विभाग :-** हे जे लाईट आपण बसविता आहे जर ५ वर्षामध्ये जर समजा काही प्रॉब्लेम आला. तर त्याची दुरूस्ती करण्याची पुर्णपणे जबाबदारी मक्तेदाराची आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** सभापती महोदय ,

**मा.सभापती :-** बोला विष्णुभाऊ बोला

**श्री. नितीन बरडे :-** सभापती महोदय आवाज येत नाहीये.

**श्री.विष्णु भंगाळे :-** आवाज येत नाहीये.

**श्री.एस.एस.पाटील , विद्युत विभाग :-** हॅलो

**मा.सभापती :-** सर्व सदस्यांनी आपआपले माईक बंद ठेवा तरच आपल्याला स्पष्ट आवाज ऐकु येईल.

**श्री.विष्णु भंगाळे :-** सभापती महोदय , मला बोलायचे आहे.

**श्री.एस.एस.पाटील , विद्युत विभाग :-** हॅलो आवाज येतोय का भाऊ हॅलो

**श्री.विष्णु भंगाळे :-** सभापती महोदय ,

**मा.सभापती :-** बोला विष्णुभाऊ बोला

**श्री.विष्णु भंगाळे :-** सभापती महोदय , मी आपले एक लक्ष विद्युत विभागाकडे वेधु ईच्छितो कि एलईडी लाईटांचे काम आपले आत्तापर्यंत कुठपर्यंत आलेले आहे आणि जे मागील काळामध्ये एलईडीचे लाईट आपल्याकडे बसविलेले होते त्यासाठी मेंटेंनन्स जे आहे तो मक्तेदार येथे येत नाहीये . तर याच्याबाबत आतापर्यंत किती टक्के लाईट बसविले गेलेले आहेत आणि आपले आता किती राहीलेले आहेत आणि बाकीचे एलईडी लाईट नाहीत आणि आता काय होतय अध्यक्ष महोदय जिथे आपण मर्क्युरी होते काही ठिकाणी उजेडाचे चांगले लाईट होते तिथले लाईट एलईडीच्या नावाखाली ते लाईटं काढुन तिथे आपले ट्युब लाईट लावणे चालु आहे. त्याच्यामुळे आम्ही उगबलेले आहे तर मला एक असे उत्तर पाहीजे आहे की आतापर्यंत एलईडी लाईट किती बसविलेले आहेत.

**श्री.एस.एस.पाटील , विद्युत विभाग :-** साधारण ७८०० एलईडी लाईट आपण बसविलेले आहेत.

**श्री.विष्णु भंगाळे :-** किती

**श्री.एस.एस.पाटील , विद्युत विभाग :-** साधारण ७८०० बसविले आहेत.

**श्री.विष्णु भंगाळे :-** म्हणजे किती पर्सेंट झालय आणि आता किती बाकी आहे .

**श्री.एस.एस.पाटील , विद्युत विभाग :-** आपण ज्यावेळेला टेंडर दिलेले होते त्यावेळेला साधारण १५ हजार स्ट्रिट लाईट चा प्रस्ताव होता आता त्यांनी १५ हजार पैकी ७८०० एलईडी लाईटस लावलेले आहेत.

**श्री.विष्णु भंगाळे :-** म्हणजे आता किती पर्सेंट बाकी आहे आता आणि आपण जे लाईट बदविलेले होते हे लाईट जर बंद पडले तर त्याच्या मेंटेंनन्स साठी मक्तेदार येतो आहे का

**श्री.एस.एस.पाटील , विद्युत विभाग :-** आपण जे एलईडी लाईट बसविलेले होते त्याच्यामध्ये जळगांव मध्ये सुरूवातीपासुन आपण त्यावेळेला त्याला सांगीतले होते की डिपीआर तयार करा आणि डिपीआर मध्ये तुम्ही रिप्लेसमेंट जे लावणार आहे ते रिप्लेसमेंट चे चार्जेस पण तुम्ही लावणार आहेत का , तर त्या अनुषंगाने काम केले आहे कारण आपण त्यांना सांगीतले होते की आधी डिपीआर तयार करून घ्या. तर डिपीआर तयार करायला पाहीजे.

**श्री. नितीन बरडे :-** पाटील साहेब

**श्री.विष्णु भंगाळे :-** ऐकु येत नाहीये. आणि आता जे लाईट एलईडी राहीलेले आहेत ते काम कधी सुरू होणार आहे. मक्तेदार येतोय का आपल्याकडे

**श्री.एस.एस.पाटील , विद्युत विभाग :-** मक्तेदाराला आपण काम सुरू करण्याचे आदेश दिलेले होते , मक्तेदाराने . ..

**श्री.विष्णु भंगाळे :-** आवाज येत नाहीये. ऐकु काहीच येत नाहीये. गोराणे साहेब

**श्री. नितीन बरडे :-** गोराणे साहेब आतमध्ये कुणाचा तरी मोबाईल चालु आहे हॉलला हॉलमध्ये कुणाचा तरी मोबाईल चालु दिसतोय

**मा.सभापती:-** नितीन भाऊ व विष्णुभाऊ आपण एक एक करून माईक ऑन करा व एक एक करून बोला दोन जणांचे माईक ऑन आहेत त्याच्यावरून असे दिसते आहे की नितीनभाऊ व विष्णू भाऊ .

**श्री.विष्णु भंगाळे :-** हॅलो

**मा.सभापती:-** विष्णुभाऊ आपल्या मोबाईलचा माईक बंद करा आणि नितीन भाऊ विष्णुभाऊंचे बोलणे संपले की मग आपण बोला

**श्री. नितीन बरडे :-** केलाय मॅडम

**मा.सभापती:-** कुणीतरी एकजण बोलत असतांना आपला माईक बंद पाहीजे.

**श्री.एस.एस.पाटील, विद्युत विभाग :-** आपण याचा डिपीआर तयार करणेबाबत मक्तेदाराला सुचित केलेले होते तर मक्तेदाराने जो डिपीआर तयार केलेला होता तर तो डिपीआर तयार केल्यानंतर त्या डिपीआर मध्ये काही तांत्रिक त्रुटी आढळुन आल्यानंतर त्या आपण महानगरपालिकेमार्फत त्या ज्या तांत्रिक त्रुटी आहेत ज्या आपल्याला दिसुन आलेल्या आहेत . त्या डिपीआर मध्ये सुधारणा करून आम्हाला सुधारीत डिपीआर द्यावा असे आपण त्यांना निर्देश दिलेले होते. त्याच्यानंतर त्यांनी महानगरपालिकेस सुधारीत डि.पी.आर. संबंधी एक मेल आपल्याला टाकलेला आहे आणि त्या मेलच्या अनुषंगाने प्रत्येक प्रभागात १५०० लावायचा पर्यंतचा आहे आणि हा मेल कालच संध्याकाळी प्राप्त झालेला आहे. तर त्यांनी दिलेला जो डिपीआर आहे तो संपुर्ण तपासुन घेतल्यानंतर आपण काम सुरू करण्याचे प्रयत्न आहेत.

**श्री. नितीन बरडे :-** पाटील साहेब आपण जे स्वच्छ सर्वेक्षण मध्ये आपल्या सार्वजनिक शौचालय येथे जे लाईट बसवले होते ते तुम्ही विभाग प्रमुख झाल्यापासुन मी तुम्हाला तक्रार करतोय समता नगरमधील लाईट अजुन चालु होत नाहीये.

**श्री.विष्णु भंगाळे :-** नितीनभाऊ आपण या प्रभाग क्रं. ५ किंवा ६ मध्ये काही ठिकाणी हे एलईडी लाईट बसविलेले आहेत.काही भागामध्ये ते लाईट बंद आहेत त्याचे मेंटेंनन्स काहीतरी तो मक्तेदार देत नाहीये याचे उत्तर काही समाधानकारक मिळत नाहीये सभापती महोदय.

**श्री.एस.एस.पाटील, विद्युत विभाग :-** आपण त्यांना तसे पत्र दिलेले आहे तसेच ते डिपीआर मध्ये आहे किंवा नाही आपण पाहुन ते दुरूस्तीचे काम करणार आहे.

**श्री. नितीन बरडे :-** पाटील साहेब आपण जे स्वच्छतेच्या ठिकाणी जे लाईट बसवले होते ते का चालु करत नाहीयेत तुम्ही

**श्री.एस.एस.पाटील, विद्युत विभाग :-** त्याच्यामुळेच आपले काही दुरूस्तीचे काम पेंडींग आहेत

**श्री. नितीन बरडे :-** पाटील साहेब ते काम करा की त्यांची वॉरंटी संपल्यावर करणार का.

**श्री.एस.एस.पाटील, विद्युत विभाग :-** ते दुरूस्तीच जे आहे आपला जो डिपीआर आहे जोपर्यंत महानगरपालिकेचा डिपीआर होत नाही.

**श्री. नितीन बरडे :-** एकतर जे लाईट बंद आहेत ते चालु करत नाहीत. लाईट बंद आहेत महिना महिनाभर काम करत नाहीत. स्टेट बँक कॉलनीत आजही दोन महिने झाले लाईट बंद आहेत. फक्त वायर साठी काम होत नाही पडले आहे ते

**मा.सभापती :-** सर्व सदस्यांच्या वतीने आयुक्त साहेबांच्या लक्षात आणुन देवु ईच्छिते की विद्युत विभागाचा हा जो प्रकार सुरु आहे. तर संथगतीने हा सगळा प्रकार केला जातो आहे. आता मध्यंतरी मी सभागृहात सुध्दा हा मुद्दा मांडला होता. तर हा डिपीआर आल्याशिवाय काम सुरूच व्हायला नको होत. त्यानंतरही ह्या सगळया चुका होतच गेल्या आहेत व होत राहील्या बर ठिक आहे. जवळजवळ वर्ष म्हणजे या एलईडी लाईट बद्दल मी स्वत:च लक्षवेधी महासभेसमोर मांडलेली होती. आज त्याला वर्ष भरापेक्षा जास्त कालावधी निघुन गेलेला आहे. तरी त्या विषयाचा कोणताही ठावठिकाणा या ठिकाणी नाहीये.दरवेळेला जी उत्तर प्रशासनाकडून दिली जात आहेत. ज्यावेळेला मी लक्षवेधी मांडली त्यावेळेला विद्युत विभाग प्रमुख पाटील साहेबच होते बरोबर आहे का पाटील साहेब.

**श्री.एस.एस.पाटील, विद्युत विभाग :-** बरोबर आहे.

**मा.सभापती :-** तर त्यानंतर हा कार्यभार बाबा सांळुखे यांच्याकडे गेला होता आता पुन्हा तो पाटील साहेबांकडे आला आहे. तरी हा डिपीआर चा घोळ संपता संपत नाहीये. आता मक्तेदाराचा मेल प्राप्त झालेला आहे त्याचा पाठपुरावा करावा आणि आता मला अस वाटत की पाटील साहेबांनी पुर्णपणे हा डिपीआर कधीपर्यंत तपासणार आणि मग हे कधीपर्यंत फायनल होणार आणि हे लवकर उत्तर अपेक्षित आहे पाटील साहेब

**श्री. नितीन बरडे :-** सभापती साहेब काय होत आहे माहिती आहे का सार्वजनिक शौचालयाला आपण लाईट बसविलेले आहेत पण ते लाईट व पोल बंद असल्यामुळे त्या स्लम भागात शौचालयासाठी बाहेरच येतात . मग आपल स्वच्छ संरक्षण चे काम कुठे होत आहे .

**मा.सभापती :-** बरोबर आहे नितीनभाऊंनी मांडलेला मुद्दा एकदम बरोबर आहे.पाटील साहेब मला सांगा यांचा जो शौचालयाशी निगडीत विषय आहे तर हे काम कधीपर्यंत पुर्ण होईल. याबद्दल अडचण काय आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सभापती महोदया, आपण बघा की या एलईडीच्या विषयावर हि संपुर्ण एलईडी ची योजना हि सुरूवातीच्या दिवसापासुन संपुर्ण वादग्रस्त ठरलेली आहे.आपणही सभागृहात एक दोन तास या विषयावर बोललात . मी ही या विषयावर संपुर्ण अभ्यास करून बोललेलो आहे. परंतू मला आज सांगा की दोन वर्षाचा कालावधी झाला ५० टक्क्यांच्या आत मधील काम झालेले आहे आणि आजही शहरामध्ये ही परिस्थिती आहे की बंद झालेले पथ दिवे बदलण्याच्या संदर्भातील सुध्दा निर्णय सुध्दा तातडीने होत नाही म्हणजे मुळ योजनेचा विषय हा बाजुलाच राहीला परंतू दुरूस्ती सुध्दा साधी होत नाहीये. एवढी कोट्यवधी रूपयांची हि मुळ योजना आपण या निर्णयापर्यंत आलेलो होतो की सदरहु योजना महानगरपालिकेच्या आर्थिक हिताच्या दृष्टीकोनातुन सुध्दा योग्य नाहीये. परंतू हि निविदा रद्द करण्याच्या निर्णयापर्यंत आपण आल्यानंतर प्रशासनाकडुन या विषयाला गांभीर्याने का घेतल जात नाहीये आणि अजुनपर्यंत अंतिमत: निर्णय याच्यावर का घेतला जात नाही . या संदर्भातील आपली भुमिका प्रशासनाने स्पष्ट करायला पाहीजे. कारण हे महानगरपालिकेच्या आर्थिक हिताच्या दृष्टीकोनातुन महानगरपालिकेचे कोट्यावधी रूपयांचे आर्थिक नुकसान याच्यामध्ये होणार आहे. आपल्याकडे पैसा कमी होता आणि या अनुषंगाने आपण या योजनेचा स्विकार केला होता किंवा केंद्र शासन आणि राज्य शासन यांच्यामध्ये झालेल्या एमओएम च्या अनुषंगाने हि योजना आपल्यावर लादली गेलेली आहे.परंतू हि लादलेली योजना महानगरपालिकेच्या आर्थिक हिताच्या दृष्टीकोनातून योग्य नाहीये. याच्याबाबतीत कुठेतरी गंभीरपणे विचार होवून हि योजना एकतर रद्द करण्यात यावी किंवा त्याचा काय निवाडा करायचा असेल तो योग्य पणे मार्गी लागायला पाहीजे.

**श्री.विष्णू भंगाळे :-** सभापती महोदय , भाऊंनी व मी म्हंटल की फक्त ४० पर्सेंट सुध्दा काम झालेले नाहीये या योजनेचे आणि वारंवार कंम्लेन्ट देवुन सुध्दा ते लाईट सुधरवण्यासाठी व त्याच्या मेटेंनन्स साठी कुणीही येत नाही सभापती महोदया तरी नक्कीच हा ठेका रद्द केला पाहीजे .तुमचा आवाज घुमतोय हॉलमधील आवाज ऐकु येत नाहीये कुणाला

**श्री.एस.एस.पाटील, विद्युत विभाग :-** आतापर्यंत हे काम ४२ टक्के पर्यंत झालेले आहे.

**श्री.विष्णू भंगाळे :-** साहेब आम्ही ४० म्हणतोय तुम्ही ४२ म्हणताय म्हणजे आता २ वर्षात जर ४२ टक्केच काम होत असेल तर म्हणजे हे काय आहे हे कसे काम होणार आहे.. मेंन्टेंनन्स का करून देत नाही तो जर दोन वर्षात त्याने लाईटं लावले असतील आणि त्या दोन वर्षात मेंन्टेंनन्स त्याने द्यायला पाहीजे.बर का आणि आता डॉक्युमेंट राहीले काय आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** सभापती महोदय , पुढचा विषय घ्या.

**श्री.विष्णू भंगाळे :-** नवनाथ भाऊ आम्ही काय विषय करतोय आणि तुम्ही म्हणताय की पुढचा विषय घ्या.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** भाऊ मी म्हटंल की पुढचा विषय घ्या. नंतर बोलु आपण

**श्री.विष्णू भंगाळे :-** नवनाथ भाऊ त्यालाच धरून हा विषय आहे ना भाऊ

**श्री.नितीन लढ्ढा :-** नवनाथ भाऊ सगळे विषय मार्गी लागतील त्याबद्दल काही वाद नाहीये भाऊ तेही विषय मार्गी लागतील हा ही महत्वाचा विषय आहे.कारण आज जवळपास दोन वर्षापासुन संपुर्ण शहरातील लाईटांचा विषय आहे ना

**श्री.विष्णू भंगाळे :-** सभापती महोदय,

**श्री.नितीन लढ्ढा :-** आणि या विषयावर सभापती महोदय या विषयावर कुणीही गंभीर होत नव्हते.

**मा.सभापती :-** बरोबर आहे हा विषय गंभीर आहे याबाबत आपण .

**श्री.विष्णू भंगाळे :-** सभापती महोदय, काम करून दाखवा नाहीतर रद्द करा.जसे नितीनभाऊंनी म्हंटल की आता आपल्या हिताचा निर्णय आहे का आणि तरी आपण मंजुरी दिली आणि मग जरी या दोन अडीच वर्षात जर काम होत नसेल आणि जळगांव वासींयाना आपण फक्त एलईडी येणार , येणार आहे असे किती दिवस सांगणार लोकांच्या पोलवर जिथे मर्क्युरी होते किंवा इतर लाईट होते सभापती साहेब तिथे आपण आजच्या तारखेला ट्युब लावुन देतोय आणि त्यांना आश्वासन देतोय हो मर्क्युरी येणार आहे. नागरीक किती दिवस आपले ऐकतील बर. उत्तर आपल्या नगरसेवकांना द्यावे लागतात.

**मा.सभापती :-** विष्णू भाऊ आपल्या सगळयांच्या भावना सभागृहाच्या लक्षात आलेल्या आहेत.तर सगळयाच सदस्यांच्या सारख्या भावना आहेत या विषयावर फक्त येथे हे नमुद करायच आहे कि मुळ योजनेचा उद्देश हा चांगला होता अशा स्थितीने त्याच्यावर योग्य पध्दतीने अंमलबजावणी झाली नाही. प्रशासकीय ढिसाळ कारभारामुळे हि योजना अनुपयोगी ठरेल असे लक्षात येत आहे. सभापती म्हणुन प्रशासनाला सक्त सुचना देण्यात येत आहेत कि येत्या आठ दिवसांत या विषयावर त्याची संपुर्ण अंमलबजावणी करण्याची प्रशासनाने याची दक्षता घ्यायची आहे आणि आयुक्त साहेब मी आपल्या लक्षात आणुन देवु ईच्छिते की हि योजना ज्यावेळी सुरू झाली आपण येथे आयुक्त नव्हतात. योजना जरी चांगली असली तरी ती वेळेवर पुर्ण झाली नाही . तर ती चांगली योजना कश्या पध्दतीने पुर्ण होवु शकते . याचे चांगल्या प्रकारे आपण या विषयावर लक्ष घालाव. सभापती म्हणुन जरी माझा कार्यकाळ संपत असला तरी मी सभागृहाची सदस्य असणार आहे आणि या विषयाचा पाठपुरावा मी करीत राहील. आता यापुढची जी स्टँडींग कमिटी आहे आणि पुन्हा या विषयावर पुढच्या सभापतींचा कार्यकाळ संपेपर्यंत फक्त चर्चा करणे अपेक्षित नाहीये . तरी याची सुयोग्य पध्दतीने अंमलबजावणी करावी. पाटील साहेबांची उत्तरे प्रत्येक सभेत मोघम असतात त्यांचा पदभार काढुन दुसऱ्या विभागात गेला व पुन्हा या विभागात पदस्थापना झाली असुन सुध्दा असेच मोघम स्वरुपाचे उत्तर आपल्याला मिळत आहे. हा सभागृहाचा अनुभव आहे. आयुक्त साहेब आपण आता या संस्थेचे प्रमुख म्हणुन या विषयावर लक्ष घाला. हि संपुर्ण जबाबदारी सभापती म्हणुन आपल्यावर सोपवित आहोत या विषयाचा सोक्षमोक्ष आता आपणच लावा.

**श्री.नितीन बरडे :-** गोराणे साहेब आयुक्त साहेब आहेत का मिटींगला

**नगरसचिव :-** हो आहेत.

**श्री.नितीन बरडे :-** आयुक्त साहेब आम्हाला एक - दोन पोल भेटतील का टाकायला , एक - दोन पोल लावायचे आहेत मनपा फंडातुन काम मिळतील का ?

**श्री.नितीन लढ्ढा :-** एक दोन विषयाचे पोल खोल करा पोलच पोल लागतील.

**श्री.नितीन बरडे :-** आयुक्त साहेब आम्हाला एक - दोन काम करायला मनपा फंड मिळेल का ?

**मा.आयुक्त :-** मनपा फंड सर्वांसाठीच आहे नितीनभाऊ

**श्री.विष्णू भंगाळे :-** नितीनभाऊ बरडे तुम्हाला मनपा फंड किती पाहीजे .

**मा.आयुक्त :-** नितीनभाऊ मनपा फंड हा सर्व सदस्यांसाठीच आहे .

**श्री.नितीन बरडे :-** आवाज नाही येत आहे साहेब आवाज नाही येत आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** सभागृहातुन आवाज येत नाहीये असे म्हणताहेत भाऊ

**श्री.विष्णू भंगाळे :-** आवाज जो आहे सभापती बोलले असतील, सचिव बोलले असतील , आयुक्त साहेब बोलले असतील किंवा पाटील साहेब बोलले असतील काहीच ऐकु आले नाही . आमच काही समाधान झालेले नाही.

**मा.आयुक्त :-** नितीनभाऊ आवाज येतोय का ?

**श्री.विष्णू भंगाळे :-** बाहेर काढा सभागृहात असतील त्याच्या व्यतिरीक्त

**मा.आयुक्त :-** विष्णूभाऊ आवाज येतोय का माझा ?

**श्री.विष्णू भंगाळे :-** बाहेरील सदस्य काढा सभागृहात असतील त्याच्या व्यतिरीक्त

**मा.आयुक्त :-** विनंती आहे सर्वांना

**श्री.विष्णू भंगाळे :-** सभापती महोदय ,

**मा.सभापती :-** आपले तिन जणांचे एकावेळेला माईक सुरू आहेत. नितीनभाऊ , विष्णूभाऊ आयुक्त साहेबांचे म्हणणे ऐकून घ्या. नितीनभाऊ बरडे आपण माईक बंद करावा नितीनभाऊ माईक बंद करा किंवा ज्यांचे माईक सुरू आहेत.

**मा.आयुक्त :-** आपल्या प्रभागामधील कामांसाठी मनपा फंड उपलब्ध होईल का त्याच्यावर उत्तर असे आहे की मनपा कडून सर्व सदस्यांच्या प्रभागामध्ये काम करण्यासाठी निधीची उपलब्धता आणि कामाच्या बाबतीत.

**श्री.विष्णू भंगाळे :-** सभापती महोदय , माझी विनंती आहे की हि मिटींग बंद करून ती पुन्हा चालु करावी सभापती महोदय विनंती आहे आमची तुम्हाला आवाज काहीच येत नाहीये.

**मा.सभापती :-** विष्णू भाऊ माझा आवाज येतोय .

**श्री.नितीन लढ्ढा :-** विष्णू भाऊ जे म्हणताहेत ते बरोबर आहे की एकदा साऊंड सिस्टिम जी आहे ना ती योग्य पध्दतीने मिटींग थोडावेळ बंद करून ते योग्य पध्दतीने दुरूस्ती करून घेण्यात यावी.

**श्री.चेतन सनकत :-** आवाज येतोय आम्हाला.

**श्री.विष्णू भंगाळे :-** अरे काय म्हणतोय चेतन

**मा.सभापती :-** विष्णू भाऊ माझा आवाज येतोय .

**श्री.विष्णू भंगाळे :-** ताई तुमच्या माईक मधुन आवाज बरोबर येत नाहीये . ये तुम्हारेपास कोणसा माईक था उसका आवाज अच्छा आ रहा था.जो सभापती मॅडम के पास दिया था वो, एकदम चांगला येतोय आता आवाज

**मा.सभापती :-** विष्णू भाऊ आपण सगळे एकमेकांना सहकार्य करूया तरी कृपया ज्या सदस्यांचे माईक सुरू असतील त्यांनी कृपया आपले माईक बंद करावे. नितीनभाऊ बरडे , चेतनभाऊ आपले दोघांचेही माईक सुरू आहेत.आपण जर माईक बंद केले नाहीत तर आपला सगळा वेळ याच्यातच जाणार आहे. आपल्याला ज्यावेळी बोलायचे असेल त्यावेळीच आपला माईक सुरू करा.

**नगरसचिव :-** येतोय का भाऊ आवाज, आवाज येतोय का ?

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** हो येतोय आवाज

**श्री.विष्णू भंगाळे :-** हो येतोय आवाज येतोय परंतू आता नाईलाज आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. २८३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेतली.

१. प्रशासकीय आदेश क्रं./विदयुत/२६ दि.१६/०९/२०२० मा.आ.श्री.चंदुभाई पटेल विपस यांचे आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन २०१९-२० अंतर्गत विदयुत विभाग यु.क्र.१ अंतर्गत पटेलवाडी शिवाजीनगर येथे १, मुक्ताईनगर दत्तगार्डन येथे ४, असे एकुण ५, विदयुत विभाग यु.क्र.२ अंतर्गत वार्ड क्रं.१६ मधील वर्षा कॉलनी दत्त मंदिरा समोर श्री.नेहते यांच्या घराजवळ १ व श्री.गणेश राणे, गणेशवाडी यांच्या घरासमोर १ असे एकुण २, विदयुत विभाग यु.क्र.४ अंतर्गत शिवराम नगर येथील आनंद हौसींग सोसायटी येथे १ व पार्वतीनगर ओपन स्पेस येथे १ असे एकुण २ अश्या विविध ठिकाणी एकुण ०९ नग सोलर स्ट्रीट लाईन (दोन पॅनल) उभारुन लाईट व्यवस्था करणे. कामी मक्तेदार भुषण इलेक्ट्रीकल्स,जळगांव यांचे अंदाजीत रक्कमेइतकेचेच दर स्विकारुन रक्कम रु.५९५१६४/- मात्र खर्चाची संविदा.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १२** **प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- पाटील राजेंद्र झिपरु**

**अनुमोदक :- सनकत चेतन गणेश**

**नगरसचिव :- जादा विषय क्र. १ :-** जळगांव शहरातील कोविड-१९ आजाराचा प्रादुर्भाव मोठया प्रमाणावर वाढत आहे. त्यासोबत पावसाळयाचे दिवस असल्यामुळे शहरात मोठया प्रमाणात पाण्याचे डबके, गटारी, तळी साचलेले आहेत. त्यामुळे डासांची उत्पत्ती वाढल्यास शहरात हिवताप, डेंग्यु, मलेरीया, चिकनगुनिया या आजाराचे प्रमाण वाढत आहे. त्याचे उपाययोजनेसाठी तातडीची बाब म्हणुन निविदा क्र.४० मधील एल-१ निविदाधारक मे.दिपक उत्तराधी,अमरावती यांचेशी संविदा करून सदरचे काम त्यांचेकडून ३ महिन्यासाठी करून घेणेस व त्यास येणाऱ्या अपेक्षीत खर्च रक्कम रु.७०,९४,०२४/- मात्रला मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** सभापती महोदया ,

**मा.सभापती :-** विष्णू भाऊ माईक बंद करा.

**श्री.राजेंद्र पाटील :-** सभापती महोदया , हॅलो सभापती महोदया आवाज येतोय का माझा

**श्री.चेतन सनकत :-** हो येतोय बोला.

**मा.सभापती :-** येतोय आवाज क्लियर येतोय बोला

**श्री.राजेंद्र पाटील :-** सभापती महोदया , हिवताप , डेंग्यु , मलेरिया, चिकुनगुणीया या आजारासाठी आपण जवळ जवळ आपण १९५ कामगार घेत आहोत . हा जो आज आपल्याकडे आलेला प्रस्ताव आहे. मला वाटत दोन महिने आधी आला असता तर आणखी त्याचा फायदा झाला असता .आता पावसाळा संपण्यात आलेला आहे.पावसाळा सुरू झाल्यानंतर मला वाटत एक महिना आधी आपण हि कार्यवाही करणे गरजेचे होते. ठिक आहे नागरीकांच्या आरोग्यासाठी आपण हा निर्णय घेण योग्य आहे.परंतू मला असं वाटत आता हे जे कामगार आपण घेणार आहोत याच्यावर कोणाचे नियंत्रण असेल.हॅलो , हॅलो , हॅलो माझा आवाज येतोय का.

**मा.सभापती :-** या विषयाची माहिती देण्यात यावी.

**श्री.राजेंद्र पाटील :-** सभापती महोदया , हॅलो सभापती महोदया आवाज येतोय का माझा

**मा.सभापती :-** येतोय आवाज येतोय बोला.

**श्री.विष्णू भंगाळे :-** आवाज येतोय पुढचे सभापती राजेंद्र पाटील यांचा आवाज आता चांगला येतोय. याच्या आधीचा जो माईक होता ना तो चेक करून घ्यावा.

**श्री.राजेंद्र पाटील :-** विष्णू भाऊ हॅलो , आपण जे कामगार घेतले होते ते कामगार तेथे अडकलेले आहेत . आता आपण हे जे कामगार घेणार आहोत तिन महिन्यासाठी तर यांच्यावर नियंत्रण कोणाचे असेल.

**श्री. सोनवाल , मलेरिया विभाग :-** याच्यावर आपल्या मलेरिया विभागाचे जे प्रमुख आहेत त्याचा चार्ज डॉ. विकास पाटील यांच्याकडे आहे.त्यांच्या सुपरविजन खाली हे सगळ काम होणार आहे आणि मी आरोग्य निरीक्षक आहे तर याच्यामध्ये त्यांच्याकडुन काम करून घेण्याची जबाबदारी माझी आणि विकास पाटील साहेबांचीच राहणार आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** मला काहीच नाही ऐकायला आल. आपला आवाज काहीच येत नाहीये.

**श्री.चेतन सनकत :-** पुर्ण काम करायची जिम्मेदारी विकास पाटील साहेब व सोनवाल यांची राहणार आहे असे ते सांगताहेत

**श्री.राजेंद्र पाटील :-** बर ,नाही काहीच ऐकायला आले नाही.

**श्री.चेतन सनकत :-** आणि या विषयाला माझे अनुमोदन आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** आपण आता जे हे जे कामगार घेणार आहोत . त्यांनी प्रभागामध्ये काम केल्यानंतर संबंधित प्रभागतील जे नगरसेवक असतील त्यांच्याशी संपर्क साधला पाहीजे . त्यांच्या सर्वांच्या सह्या घेण्याचे काम या कामगारांनी केले पाहीजे. नगरसेवक डायरी हि ठेवली गेली पाहीजे आणि सर्व नगरसेवकांडुन यांनी सह्या घेतल्या पाहीजे.

**श्री.चेतन सनकत :-** एक काम करा ताई

**श्री. सोनवाल , मलेरिया विभाग :-** हो

**श्री.राजेंद्र पाटील :-** नगरसेवक डायरी ठेवली गेली पाहीजे आणि सर्व नगरसेवकां जवळुन यांनी सह्या घ्यायला पाहीजे.

**श्री. सोनवाल , मलेरिया विभाग :-** ज्या प्रभागात ते काम करतील त्या प्रभागातील जे नगरसेवक असतील हे काम झाल्यावर आपण त्या नागरीकांच्या सह्या घेणार आहेत आणि नंतर जे सन्मा सदस्य आहेत प्रभागातील आपण त्यांची म्हणजे जी नगरसेवक डायरी आहे त्याच्यावर आपण सह्या घेणार आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** काहीच ऐकायला येत नाहीये.

**श्री.चेतन सनकत :-** आम्हाला तर येतोय भाऊ

**श्री.नितीन बरडे :-** चेतनभाऊ नाही येत आहे.

**श्री.विष्णू भंगाळे :-** आपला आवाज येतोय पण सभागृहातील आवाज येत नाहीये ना.

**श्री.राजेंद्र पाटील :-** सर्व सन्मा.सदस्यांचा आवाज येतोय परंतू सभागृहातील आवाज ऐकायला येत नाहीये.

**श्री.विष्णू भंगाळे :-** आम्ही तेच सांगतोय आता सांगुन सांगुन थकलो .

**श्री. सोनवाल , मलेरिया विभाग :-** हॅलो आपण ज्या प्रभागात काम करणार आहे. ज्या दिवशी जो भाग आहे आणि संबंधित जो कामगार आहे तर आपण काम झाल्यावर त्या वॉर्डातील जे नागरीक आहेत त्यांच्या सह्या घेवुन व त्यानंतर आपण नगरसेवकांच्या सह्या आपण घेणार आहे.

**मा.सभापती :-** चेतनभाऊ माईक ऑन करा. बोला चेतन भाऊ

**श्री.चेतन सनकत :-** ताई मला बोलायचे आहे. हा जो विषय या प्रस्तावाला माझे अनुमोदन आहे आणि मला थोडीशी अशी माहिती पाहीजे आहे प्रशासनाकडुन कि आता मागच्या आठवड्यात शासनाचा जि.आर निघालेला आहे, परिपत्रक निघालेले आहे. की कोविडच्या धर्तीवर जे काम सुरू आहे आपले ते आपल्या १४ व्या वित्त आयोगाच्या व्याजातुन खर्च करावे.मग आपण मनपा फंडातुन का खर्च करता आहेत. कारण मनपा फंड आपल्याला दुसऱ्या कामात येवु शकतो . हॅलो , हॅलो ताई आवाज येतोय . ताई मला माहिती अशी पाहीजे मला की शासनाने आता एक जिआर काढलेला आहे की एक परिपत्रक काढलेले आहे कोविड संदर्भात की १४ व्या वित्त आयोगाचा जो निधी असतो त्याचे जे व्याज असते तो शासन जमा होतो की महापालिकेला भेटतो हि माहिती पाहीजे.

**मा.सभापती :-** चेतनभाऊ आपला आवाज समजत नाहीये. तरी आपण आपला प्रश्न थोडक्यात मांडा .

**श्री.चेतन सनकत :-** ताई मी काय म्हणतोय

**मा.सभापती :-** नितीनभाऊ बरडे आपला माईक बंद करा.

**श्री.चेतन सनकत :-** ताई आवाज येतोय

**मा.सभापती :-** हा बोला

**श्री.चेतन सनकत :-** हॅलो

**मा.सभापती :-** हो बोला येतोय बोला

**श्री.चेतन सनकत :-** ताई म्हटंल मला याची माहिती अशी पाहीजे आहे की शासनाने आता जि.आर काढलेला आहे , परिपत्रक काढलेले आहे त्या संदर्भात ते त्याच्यामध्ये सर्वांना भेटतो की काय कसे हि माहिती पाहीजे हॅलो

**मा.सभापती :-** हा विषय समजला नाही जि.आर आहे तो

**श्री.नितीन लढ्ढा :-** शासन निर्णय आहे १४ व्या वित्त आयोगाचा शासन निर्णय आहे तो

**श्री.चेतन सनकत :-** भाऊ माझा विषय असा आहे.

**मा.सभापती :-** चेतनभाऊ .

**श्री.चेतन सनकत :-** आपण जो खर्च महापालिकेच्या निधीमधुन खर्च करतोय ते कोविड संदर्भातील तर तो आपण त्याच्या व्याजामधुन खर्च करतोय का आपल्या मनपा फंडातुन नाही महापालिकेच्या दुसऱ्या कामासाठी तरी युज करता येईल आपल्याला

**मा.सभापती :-** चेतनभाऊ आपला प्रश्न

**श्री.चेतन सनकत :-** हॅलो , हॅलो

**मा.सभापती :-** चेतनभाऊ आवाज येतोय का

**श्री.चेतन सनकत :-** हॅलो बोला ना ताई

**मा.सभापती :-** चेतनभाऊ आपला प्रश्न असा आहे की जसे १४ वा वित्त आयोगाच्या पैश्यांचे जे व्याज आहे त्याचा उपयोग आपण दुसरी कडे करू शकतो का असा आपला प्रश्न आहे का ?

**श्री.चेतन सनकत :-** हो बरोबर १४ व्या वित्त आयोगाचे जे व्याज आहे ना त्याच्यामधुन कोविड चे सर्व जे काही काम असतील त्याच्या विषयात काही खर्च मनपा फंडातुन आहे . काही खर्च १४ व्या वित्त आयोगाच्या याच्यातुन आहे मला हिच माहिती पाहीजे आहे.

**मा.सभापती :-** चेतनभाऊ पवार साहेब याचे उत्तर देताहेत.

**श्री.नितीन लढ्ढा :-** कुठल्याही वित्त आयोगाचा व्याजाचा निधी जो आहे तो राज्य शासनाकडे परत करावा लागतो आत्तापर्यंत कधीही व्याज खर्च करण्याची परवानगी मिळालेली नाहीये

**श्री.चेतन सनकत :-** भाऊ १४ तारखेला शासन परिपत्रक आलेले आहे. काविड च्या विषयाला कोणताही तो विषय असो त्याला जे व्याज मिळते आहे ते व्याज खर्च करण्याची मुभा शासनाने दिलेली आहे म्हणुन मी हा मुद्दा मांडलेला आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** निश्चितपणे चेतनभाऊ आपण जो शासन निर्णय सांगीतला तो असेल ना तर ती आंनदाची बाब आहे ती मा.आयुक्त महोदय या संदर्भातील म्हणजे १४ वा वित्त आयोगाचा जो राज्य शासनाचा पैसा आलेला आहे. तो जर का मोठ्या प्रमाणात राज्य शासनाला परत करीत असतो आणि या शासन निर्णयान्वये जर कधी तश्या पध्दतीचा पैसा हा खर्च करण्याची जर का मुभा असेल. तर मला वाटत की तो प्राथमिकतेने खर्च हा त्या व्याजाच्या पैश्यातुन मिळवायला पाहीजे म्हणजे आपला जो आयोगाचा निधी आहे तो सुध्दा सुरक्षित राहील आणि महानगरपालिकेला त्याचा आर्थिक फायदा होईल. तर आयुक्त महादेयांनी जर सष्ट केले तर निश्चतपणे मनपा फंड वाचेल आणि वित्त आयोगाचा पैसाही वाचेल . व्याजाच्या रक्कमेमधुन १४ व्या वित्त आयोगाच्या ज्या मोठ्या रक्कमा आपल्याकडे पडुन आहेत. त्या तर त्या व्याजाच्या रकमेतुन हा खर्च करावा आणि चेतनभाऊ यांनी ज्या पध्दतीने सांगीतले आहे तसा शासन निर्णय असले तर वाचुन दाखवला तर निश्चितपणे तो महानगरपालिकेच्या आर्थिक हिताच्या दृष्टीकोनातुन योग्य असा विषय आहे.

**श्री.कपिल पवार, मुख्यलेखाधिकारी :-** सन्मा.सभागृह , आता सन्मा.सदस्यांनी जो मुद्दा येथे मांडला तर १४ ऑगष्ट २०२० ला जो शासन निर्णय आला आहे. तर त्याच्यात कोविड संदर्भातील व्यवस्थापन आणि त्याच्या संदर्भातील इतर बाबी संदर्भातील इतर खर्च हा १४ व्या वित्त आयोगाच्या व्याजातुन म्हणजे त्याच्या खर्च वित्त आयोगाच्या व्याजातुन देणे. आता याच्यामध्ये यापुर्वीचे जे वित्त आयोगाचे जे आहे म्हणजे १०वा , ११ वा १२ वा आणि १३ वा आयोग याचे जे व्याज आहे ते याच्यात न घेता ते आम्हाला परत करा आणि त्याच्यातुन १४ व्या वित्त आयोगाचे खर्च करा. आणि आता हा जो विषय मांडला आहे. आता याच्यात डेंग्यु , चिकुनगुणिया, मलेरिया आणि किंवा इतर जो आपल्याला खर्च येणार आहे हा खर्च आपल्याला जो दिलेला आहे १४ वा वित्त आयोगातुन त्याच्यातुनच खर्च करावा लागेल.

**श्री.राजेंद्र पाटील :-** सभापती महोदया ,

**नगरसचिव :-** भाऊ आदरणीय भाऊ आदरणीय नितीनभाऊ सर्वानुमते मंजुर आहे का?

**श्री.नितीन लढ्ढा :-** सर्वानुमते मंजुर आहे. सभापती महोदया सर्वानमुते मंजुर करण्यात यावा.

**मा.सभापती :-** बोला नितीनभाऊ

**श्री.नितीन लढ्ढा :-** सभापती महोदया , आज साधारणत: आज आपल्या सभेचा शेवटचा दिवस आहे. आपल्याला एक वर्षाची जी संधी मिळालेली होती . आज आपली जी टर्म होती ती जवळपास ६ महिने कोविड मध्ये निघालेली आहे.आपण या १ वर्षाच्या कारकिर्दीत जळगांव शहर महानगरपालिकेच्या सन्मा.स्थायी समिती सभापती पदी योग्य

पध्दतीने योग्य  हाताळुन सर्व सदस्यांना योग्य न्याय देण्याचा प्रयत्न केला. जरी आपल्याला वर्षभराचा कालावधीची संधी मिळाली परंतू आपण कोविड मुळे आपली जी भुमिका होती ती अत्यंत चांगली होती. विशेषत: सभागृहात झालेल्या फस्टेंशन नंतर पारीत झालेले ठराव हा चोविस तासांच्या आत पाठविण्याचा आपण एक चांगला पायंडा या महानगरपालिकेमध्ये सुरू केलेला आहे. त्याचे मी आपले मनापासुन अभिनंदन करतो . निश्चितपणे आपली कारकिर्द स्मरणात राहील आणि ज्या काही भविष्यात पुढील संधी आपल्याला मिळतील. त्या संधीच्या अनुशंगाने मी आपल्याला पुढील वाटचालीकरीता शुभेच्छा देतो. आज आपली सभापती पदाची शेवटची सभा आहे. ती ही पुर्ण निर्वीवादाच्या वातारवणात पार पडलेली आहे.परंतू फक्त आता आपल्या वतीने प्रशासनाला एक सुचना मांडु ईच्छितो कि साधारणत: आपण एक महिन्यापुर्वी या स्थायी समितीच्याच सभागृहामध्ये महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या जेसीबीच्या टायरच्या संदर्भातील चर्चा केलेली होती आणि तब्बल आता त्याला एक महिना उलटला आहे. जवळपास मी म्हणतो की ९ महिन्यापुर्वी प्रस्ताव हा महानगरपालिकेच्या जेसीबीचे टायर बदलण्याचा प्रस्ताव हा एक साधारणत: हा दि. ११/१२/२०१९ पासुन सुरू झालेला आहे प्रस्ताव आणि अद्यापपावेतो सुध्दा त्या वाहनांना टायर उपलब्ध करून दिलेले नाही . माझी एकच विनंती आहे की ही सभा संपल्यानंतर आपण आणि मा.आयुक्त महोदय आपण एकदा कचरा डेपोवर भेट द्यावी . कचरा डेपोवरची परिस्थिती बघावी . तेथील त्या टायरांची खात्री करावी. म्हणजे आज मला सांगा की आपली लाखो रुपयांची मशिनरी ती निव्वळ ५० हजार ते लाख दोन लाख रूपयांच्या टायर साठी हि तिथे पडुन आहे. तसेच त्याची परिस्थिती ईतकी ढिसाळ झालेली आहे की ती डोळयाने तुमच्याकडून पाहविली सुध्दा जाणार नाही . अश्या पध्दतीने मी पोटतिडकीने सभागृहात एक एक महिन्यापुर्वी चर्चा करून सुध्दा एक एक वर्षा पुर्वीचे प्रस्ताव हे मंजुर होत नसतील तर कश्या प्रकारच्या पध्दतीचे प्रशासनाकडुन कामाच्या अपेक्षा ठेवाव्यात की ज्या वेळेला गतीमान प्रशासन हवायला हवे होते. एक चांगल्या पध्दतीचे प्रशासन असायला पाहीजे. एक चागला समन्वय प्रशासनामध्ये असायला हवा. चर्चा करून जर कधी प्रशासनाचे प्रश्न मार्गी लागत असतील मग शेवटी मग कितीही बोलले तर तेही योग्य वाटत नाही. आंदोलन केले तेही योग्य वाटत नाही. मग कुठल्या मार्गाने जावे प्रशासनाकडे याबाबतीत प्रशासनाने आधी खुलासा करावा. त्याच अनुषंगाने टायरांच्या बाबतीत एक भुमिका सांगतो आदरणीय सभापती महोदया कि आजच्या साधारणत: १ महिन्यापुर्वी गणपती विसर्जनाच्या आदल्या दिवशी टि. बी. सॅनिटोरियमच्या वाहनतळावर गणपती विसर्जन कामी आयुक्त महोदय भेट द्यायला गेलेले होते त्यावेळेला मा.आयुक्त महोदय , उपायुक्त. कपिल पवार साहेब , कैलास आप्पा आणि मी स्वत: महानगरपालिकेच्या बंद पडलेल्या वाहनांची परिस्थिती त्यांना आम्ही तेथे निदर्शनास आणुन दिली.आज कोट्यवधी रुपयांचे कॉम्पॅक्टरची स्थिती मा.आयुक्त महोदयांनी त्यांच्या डोळयादेखत पाहीली सर्व सखोलाने पाहीली. आयुक्त महोदयांनी ते कॉम्पक्टर तात्काळ दुरूस्ती साठी कोणाला तरी आदेश दिलेले होते . आज तब्बल एक महिन्याचा कालावधी झाला . त्याच्यात नेमकी कुठे अडचण झालेली आहे.जेव्हा स्वत: आयुक्त महोदय अश्या पध्दतीचे कामाला दिशा मिळुन जर कधी कामाला गती प्राप्त होत नसेल. तर या महानगरपालिकेचा कारभार चालणार कसा आणि अश्या पध्दतीने कोट्यावधी रूपयांच्या वाहनांची ही माती होईल आणि ती भंगारच्या भावात मातीमोल भावात ती विकली जातील. मग अश्या पध्दतीने कोट्यावधी रूपयांच्या वाहनांचे ज्यावेळी माती होत असेल तर हे कुठपर्यंत सहन करायचे. आपण मा.आयुक्त महोदयांना विचारा कि आयुक्त महोदय स्वत: तेथे आलेले होते आणि कैलास आप्पा सुध्दा होते मी होतो कपिल पवारजी साहेब होते सहा.आयुक्त साहेब होते. परंतू याबाबतीत वाहन विभाग कुठेही काहीही हालचाल करायला तयार नाही म्हणजे किती किती निष्काळजी पणा म्हणावा याला की अश्या कोट्यावधी रूपयांच्या किती मालमत्ता महानगरपालिकेच्या ज्या दुर्लक्षित होताहेत. आपण यापुर्वी गिरणा पंपीगच्या पाईपलाईनच्या संदर्भात मशिनरी च्या संदर्भात कितीवेळा बोललेलो आहे. कोट्यावधी रूपयांची मशिनरी आहे . कालांतराने ती सगळी भंगार होतेय व ती कवडीमोल भावात ती विकली जातेय परंतू वेळेवर या सर्व गोष्टींचे नियोजन केले तर याच कोट्यावधी रूपयांच्या मालमत्तेचे आपण काहीतरी केले तर योग्य पध्दतीने विनीयोग करू शकतो किंवा त्याची विक्री करून त्याचा पैसा उभा केला जाऊ शकतो. मल संकलित कंटेनर तेथे पडलेले आहेत. मल संकलित घंटागाड्या तेथे पडलेल्या आहेत. अश्या कोट्यावधी रूपयांच्या मालमत्तेचे जर अश्या पध्दतीने डोळयादेखत माती होत असेल तर ते योग्य नाहीये. एकीकडे आपण काटकसरीचे धोरण म्हणुन आपण विकास कामांना ब्रेक लावतो आणि ईथे कोट्यावधी रूपयांची मालमत्ता मातीमोल होतेय. आपण स्वत: जावुन एकदा व्हिजीट करा कि त्या जेसीबीच्या टायरांची परिस्थिती बघा की आपल्याला लाज वाटेल की आपल्या महानगरपालिकेच्या कोट्यावधी रूपयांच्या की ज्याचे पंक्चरचे बिल आपण लाखो रूपये देवुन टाकलेले आहे. दिवसातुन ४ वेळा टायर पंक्चर होते . मशिनची उपलब्धता फक्त तासभर मिळते आणि लाखो रुपये टायरच्या पंक्चरचे बिल भरले जाते आणि हजारो रूपयाचे टायर विकत घेण्यासाठी आपल्याला वेळ मिळत नाहीये.

**मा.सभापती :-** नितीनभाऊ

**श्री.नितीन लढ्ढा :-** मग कसा काय कारभार चालणार आहे या शहराचा मला सांगा बर

**मा.सभापती :-** नितीनभाऊ आपण जे मुद्दे मांडलेले आहेत.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सभापती महोदया आज खर बघितलं तर आपली शेवटची सभा हि गोड व्हावी म्हणुन आम्ही खुप विचार केला होता की आजच्या सभेमध्ये कोणतेही कटु विषय घेण्यात येवु नये . परंतू आपण ज्या ज्या वेळेला मशिनरीच्या संदर्भामध्ये आपण माहिती घेतो आणि त्याच्यामध्ये कुठल्याही प्रकारची प्रगती होतांना दिसुन येत नाही. तर मनामध्ये वाईटही वाटते व मनामध्ये रागही येतो.

**मा.सभापती :-** निश्चितच येतो नितीनभाऊ

**श्री.नितीन लढ्ढा :-** तर कृपया आपण प्रशासनाला सभापती महोदया सांगावे की याबाबतीत खुलासा करावा की नेमकी काय अडचण आहे.

**मा.सभापती :-** नितीनभाऊ यांनी मांडलेल्या मुद्दयांचा खुलासा प्रशासनाने करावा.

**श्री.पंकज पाटील , वाहन विभाग :-** सदरचे वाहन दुरूस्ती करणेकामीच्या प्रक्रीया सुरू आहेत.

**श्री.विष्णु भंगाळे :-** सभापती महोदय , आवाज येत नाहीये आमचा आवाज येतोय का

**मा.सभापती :-** विष्णुभाऊ येतोय बोला

**श्री.नितीन बरडे :-** आज विभाग प्रमुख नसतील आणि त्यांचे एकच उत्तर असेल की आज आपण कोणतेही हे विकत घेवु शकत नाही.

**मा.सभापती :-** सगळया सदस्यांना एकच विनंती आहे की त्यांनी आपापले माईक बंद करावे.

**श्री.विष्णु भंगाळे :-**सभापती महोदय,आता ईमर्जन्सी लागणाऱ्या वस्तु ज्या आहेत त्यांना इतर काही पर्याय असतील ना

**श्री.नितीन बरडे :-** आयुक्त साहेबांनी शब्द दिला होता की दोन सभा आधी की उद्याच्या उद्या ते घेतले जातील.

**श्री.विष्णु भंगाळे :-**सभापती महोदय,

**श्री.नितीन बरडे :-** वाहन विभाग प्रमुखांना बोलु द्या.

**मा.सभापती :-** नितीनभाऊ, विष्णुभाऊ आपले माईक बंद करा.

**श्री.पंकज पाटील , वाहन विभाग :-** आपण तो प्रस्ताव ठेवलेला आहे व त्यावर त्यांनी क्युरी आलेल्या आहे आणि वेळोवेळी कॉम्पॅक्टर जे आहे.

**श्री.नितीन बरडे :-** काय बोलले मॅडम हे

**श्री.पंकज पाटील , वाहन विभाग :-** जेसीबी टायरच्या संदर्भामध्ये आपण वेळोवेळी ज्यांचेकडून जेसीबी घेतलेल होते त्यांच्याशी संपर्क केला व त्या टायरच्या किमती ज्या आहेत हे विचारले होते पण त्यांनी काही मनावर घेतले नाही तरी मी पत्रव्यवहार केला आणि आपण आपल्या वाहन विभागामार्फत ते नविन घेण्याचे प्रस्तावित केलेले आहेत. आणि मी माझ्या विभागाकडुन पुर्तता केलेली आहे पण अजुनही काही उत्तर मिळालेले नाहीये . मी स्वत: त्याचा फालोअप घेतलेला आहे. तरी अद्याप पावेतो हि प्रोसिजर केलेली नाहीये

**श्री.नितीन बरडे :-** गोराणे साहेब आवाज येंत नाहीये हॉलमधुन

**श्री.विष्णु भंगाळे :-**सभापती महोदय,

**मा.सभापती :-** विष्णुभाऊ बोला

**श्री.नितीन बरडे :-** मॅडम काहीच समजत नाहीये . काय बोलताहेत तर ते

**श्री.विष्णु भंगाळे:-** आज अधिकारी काय उत्तरे देताहेत ते कळालेले नाही. परंतू नक्कीच सभापती महोदय आज आपण मागील काळातील सभापती असतांना आज ही मिटींग आपली शेवटची मिटींग आहे सभापती म्हणून एक चांगलं कार्य आपल्या या माध्यमातुन आपल्या या जळगांव महानगरपालिकेला आम्हाला या स्टँडींग कमिटीला पाहायला मिळालं नक्कीच आपण सर्वांना चर्चा करण्याची संधी सुध्दा आपण दिली आणि त्या विषयांवर चर्चा केल्यानंतर ईन्व्हाल्व होणे हे सुध्दा आवश्यक होते. परंतू बऱ्याच काही गोष्टीवर झाल काही गोष्टी आपले प्रशासनाच्या हातात येतात आणि हे झालेले आहे परंतू आपला प्रयत्न हा एक चांगल्या प्रकारे हा होता आणि आहे. आपण अभ्यास पुर्ण आपण वकील आहात त्या माध्यमातुन आणि शिस्तप्रिय अशा एक काम करण्याचा जो विडा होता तो आपण चांगल्या प्रकारे पार पाडलेला आहे आणि नक्कीच पुढील भविष्य काळासाठी आपल्याला शुभेच्छा देतो. या पुढील पदांवर आपण नक्कीच विराजमान व्हावं अशी आमची शुभेच्छा आहे . यासाठी म्हणतोय सभापती महोदय की जेव्हा मी २००८ ला सभापती होतो तर २०१२ ला महापौर झालो अश्याच शुभेच्छा मी आपल्याला देवु ईच्छितो व येणाऱ्या काळामध्ये आपण नक्कीच महापौर पदी बसावे या शुभेच्छा देतो धन्यवाद.

**श्री.नितीन लढ्ढा :-** विष्णू भाऊ मी काय म्हणतो की जे सभापती झालेले आहेत ते पुढे चालुन महापौर झालेले आहेत.

**श्री.विष्णु भंगाळे:-** हो म्हणुनच म्हणतोय. शुचिता ताई हाडा या पुढील महापौर होतील.

**मा.सभापती :-** सैईदा ताई बोलताय बोला सईदा ताई

**सैईदा बी शेख:-** हॅलो सभापती मॅडम सैईदा बी बात कररी मै मेरे वॉर्ड मे काम करणेका बोलरी हमने एक काम बोला है ऊसको १ साल होगा अभी तक काम नी होरा , आयुक्त साहब हमारे वार्ड का काम कबतक होंगा हम कबतक सहन करेंगे.

**मा.सभापती :-** सईदा ताई यांच्या वॉर्डा मध्ये काही काम सांगीतलेले आहे मला वाटत स्लॅब टाकायचा आहे. तरी या सन्मा सदस्यांची एक यादी तयार करण्यात यावी . प्रशासनाने याची ताबडतोब दक्षता घ्यायची आहे तसे त्यांना ताबडतोब कळविण्यात यावे याची नोंद घ्यायची आहे.

**श्री.दिलीप पोकळे :-** आपले प्रमुख वैद्यकीय अधिकारी डॉ.रावलानी साहेब यांना काल मी एक पत्र दिलय . आपल्या जळगांव शहरामध्ये ज्या अँटीजीन कीट च्या संदर्भात माहिती जमा करायला लावली होती . तर त्यांनी याच्यावर काय माहिती जमा केली मला याची माहिती द्यावी.

**मा.सभापती :-** पोकळे भाऊंनी जो मुद्दा मांडला आहे त्याची माहिती प्रशासनाने द्यावी. सैईदा बी आपका माईक बंद कीजीये.

**डॉ.रावलानी, प्र.वैद्यकीय अधिकारी:-** सन्मा.सभागृह आपण जे पत्र दिलेले होते त्याचे उत्तर मी आपल्याला देणार आहे. त्यात आपण पहिला प्रश्न विचारला होता की ०१/९/२०२० पासुन तर आपल्या CCC मध्ये कोरोना पॉझिटिव्ह किती रूग्ण दाखल झालेले होते तर दि.०१/०९/२०२० पर्यंत १०९४४ आहेत त्याच्यामध्ये दुसरे आपले होते. त्याच्यापैकी पॉझिटिव्ह आणि निगेटिव्ह २७०० पॉझिटिव्ह आहेत आणि ८१२१ निगेटिव्ह आहेत. एकूण तपासणी केलेल्या रूग्णांची संख्या व दाखल केलेल्या रूग्णांची संख्या आपल्या CCC मध्ये या कालावधीत १५०३७ रूग्ण संख्या पॉझिटिव्हचे दाखल झालेले होते. आपण एकुण तपासणी केलेल्या रूग्णांपैकी तर शासनाच्या मार्गदर्शनानुसार आपण जे होम क्वारंटाईन केलेल्या रूग्णांची संख्या म्हणजे आपण जे घरी गेले होते आणि इतर ठिकाणी जे ॲडमिट झाले होते . कारण आपल्याकडे मिळत असलेल्या वैद्यकीय सेवा त्यांना आवडत नव्हती . शासनाच्या मार्गदर्शनानुसार सर आपण जे होम क्वारंटाईन करतो आपण त्यांच्याकडून लिहुन घेतो आणि अश्या रूग्णांची सेवा करणाऱ्या डॉक्टरांचे सुध्दा शिफारस पत्र आपण घेतो . या कोविड रोगाच्या संसर्गा बाबत आपण नंतर आता सुरू असलेली परिस्थिती पाहीली तर ती आजच्या तारखेला पाहीली तर आता म्हणजे आपण ज्यांना होम क्वारंटाईन केले असेल . नागरीकांच्या विनंती व शासनाच्या आदेशानुसार आपण त्यांना काही अटींवर उदा. मास्क न लावणे सोशल डिस्टंसिंग न ठेवणे. किंवा स्वच्छता न राखणे आणि शासनाचे नियम न पाळणे किंवा संसर्ग वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**श्री.दिलीप पोकळे :-** आता आपले जे कोविड केअर सेंटर जे आहेत त्यापैकी आपण किती बंद केले

**डॉ.रावलानी, प्र.वैद्यकीय अधिकारी:-** सर आता जे आपल्याकडे पुर्वी CCC जे सुरू होते त्यामध्ये आताची रूग्ण संख्या पाहाता आपण ते बंद केलेले आहेत.

**श्री.विष्णु भंगाळे :-** तुमचा आवाज येत नाहीये .

**श्री.दिलीप पोकळे :-** सभापती महोदय यांचा आवाज येत नाहीये.

**डॉ.रावलानी, प्र.वैद्यकीय अधिकारी:-** हॅलो आता आवाज येतोय का सर हॅलो

**श्री.विष्णु भंगाळे :-** आवाज आधीपासुनच बरोबर येत नाहीये तुमचा आवाज येत नाहीये .सभापती महोदय तुम्ही समजुन घेत नाहीयेत पण ते क्लिअरच होत नाहीये.

**डॉ.रावलानी, प्र.वैद्यकीय अधिकारी:-** हॅलो आता आवाज येतोय का सर हॅलो रूग्णसंख्या CCC मध्ये रूग्ण संख्या जी होती ते सर्व फुल होते. आता रूग्ण संख्या कमी असल्यामुळे तर त्या बिल्डिंग आपल्याला खाली करून द्यावी लागली.

**श्री.दिलीप पोकळे :-** सभापती महोदय तुम्ही ताब्यात दिल्या का बिल्डिंग त्या परत त्यांच्या.

**डॉ.रावलानी, प्र.वैद्यकीय अधिकारी:-** सर आपण एक दिली होती मला आणि काही आयडीया नाही

**श्री.दिलीप पोकळे :-** तुम्ही एक काम करा मी जे प्रश्न विचारले त्याचे मला लेखी उत्तर द्या. आपण किती बिल्डिंग घेतल्या होत्या किती रूग्ण होते या बाबतची संपुर्ण माहिती मला लेखी स्वरूपात मिळावी.

**डॉ.रावलानी, प्र.वैद्यकीय अधिकारी:-** सर होय सर देतो .

**श्री.दिलीप पोकळे :-** कोविड संपलाय का आता आताही कोविडचे पेशंट सापडताहेत की नाही . ऐनवेळी जर पेशंट जास्त झाले तर मग काय करायचे. बिल्डिंग मिळतील का आपल्याला त्याला मेंन्टेंन कोण करत होते जो कोणी असेल

**श्री.विष्णु भंगाळे :-** सभापती महोदया, म्हणजे वकील साहेब तुमच म्हणण असे आहे की, तुम्ही ती बिल्डिंग जमा करून दिली

**श्री.दिलीप पोकळे :-** हो त्यांनी जमा केली आहे

**श्री.विष्णु भंगाळे :-** सभापती महोदया, सर्वांचा निष्कर्ष असा आहे की येणाऱ्या काळामध्ये केव्हाही कोरोना हा वाढु शकतो. मग त्यावर उपाययोजना काय आहे

**मा.सभापती :-** विष्णू भाऊ

**श्री.दिलीप पोकळे :-** हो मग आतापर्यंत हे काय करताय

**मा.सभापती :-** विष्णू भाऊ त्यांनी उत्तर दिलेले आहे की ज्या बिल्डींग होत्या त्या जमा केलेल्या आहेत कोविड संदर्भात ज्या बिल्डिंग होत्या त्या जमा केलेल्या आहेत. तरी याबाबत प्रशासनास सुचना देण्यात येत आहे की सदस्यांना लेखी कळविण्यात यावे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** मला असे बोलायचे आहे की आता बांधकाम विभागाचे खडके साहेबांचा शेवटचा दिवस आहे . दोन महिने चार्ज आता त्यांच्याकडे होता खडकेसाहेबांकडे याच्यापुढचे जे अधिकारी काय दिवे लावतील हे तुम्हाला चांगल माहिती आहे आणि दोन महिन्यामध्ये यांनी पण काय दिवे लावले हे सर्व जळगांव शहराला माहिती आहे. आता जवळपास जे हाल खराब आहे माझ्या माहितीनुसार ते अधिकारी यांची जी दिलगीरी झालेली आहे कामाच्या संदर्भात.

**मा.सभापती :-** बोला नवनाथभाऊ.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** माझे असे म्हणणे आहे की, हॅलो.

**मा.सभापती :-** बोला नवनाथभाऊ येतोय तुमचा आवाज

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** आज खडके साहेब रिटायर्ड होताहेत याच्या आधी बांधकामचा चार्ज भोळे साहेबांकडे होता. आता दोन महिने त्यांच्याकडे आला. आता जी जळगांव शहराची परिस्थिती आहे. हि परिस्थिती सगळया नगरसेवकांना माहिती आहे जळगांव शहरातील नागरीक काय काय बोलतात ते मग ती रोडांची असो की गटारींची असो. तर माझ्या माहितीनुसार याला सगळे जबाबदार जाणारे अधिकारी असतात आणि सगळे खातेप्रमुख असतात. तर पुढच्या भविष्यात त्यांच्यावर काय कार्यवाही होणार आहे .

**मा.सभापती :-** नवनाथभाऊ जो मुद्दा आता येथे मांडलेला आहे आणि आयुक्त साहेब जे सदस्यांनी आता येथे मुद्दे मांडलेले आहेत तर बांधकाम विभागाशी संबंधित जी काही काम आहेत. त्यामधील जे काही डिटेल्स आहेत त्या सगळयाच सदस्यांना कामे करण्याच्या सबंधात कोणत्या अधिकाऱ्याने काही कामे थांबवुन ठेवली हे पाहायचे आहे. त्यामुळे सदस्यांना नागरीकांच्या रोषाला सामोरे जावे लागते आणि अश्या परिस्थतीमध्ये आयुक्त म्हणून या पदावरील व्यक्तीने जी काही कामांमध्ये दिरंगाई केलेली आहे.तर आपण त्यावर काय ॲक्शन घेणार अस त्यांच म्हणण आहे. याच्या संदर्भात मी आधीच सभागृहात . .

**सैईदा बी शेख :-** मै क्या बोल रही हु

**मा.सभापती :-** सैईदा बी दोन मिनिटे थांबुन घ्यावे आपल्याला संधी दिली जाईल. तर प्रशासनाला सदस्यांच्या ज्या भावना आहेत त्या लक्षणीय आहेत या संदर्भात मी आपल्या लक्षात आणु ईच्छिते आयुक्त साहेब की बांधकाम विभागामार्फत मजुर पुरविण्यासाठी जे काम असत बांधकाम विभागासाठी ट्रॅक्टर आणि ते मजुर हे काम मागच्या अडीच वर्षामध्ये एस.के. कॉन्ट्रॅक्टर या मक्तेदाराकडे दिलेले होते आणि मला वाटते एस.के. कॉन्ट्रॅक्टर या मक्तेदाराशी संबंधित ज्या काही संविदा आहेत त्या सगळया संविदेबाबत काहीतरी संदिग्धता आहे हे सगळया सभागृहाला माहिती आहे.आता हया सगळया संविदा वादातीत आहेत. या सगळया संविदांचा वाद तेव्हा सुरू होता तेव्हा बांधकाम विभागाचा भोळे साहेबांकडे चार्ज होता . एस.के. कॉन्ट्रॅक्टर या ठेकेदाराची मुदत जुलै महिन्यात संपत आली असतांना बांधकामच्या निविदेची हे प्रशासनाला सगळया सदस्यांनी सुध्दा लक्षात आणुन दिले होते. मी सभापती म्हणून वारंवार या विषयाबद्दल सभेत सुचना दिलेल्या होत्या. नेमके होत काय आहे सभागृहामध्ये प्रशासन करत काय आहे की प्रत्येक निविदे प्रक्रीयेची मुदत संपुन जाते आणि त्यानंतर जेव्हा कागदपत्रांची डिमांड होईल तेव्हा हि निविदा प्रक्रीया सुरू करायची जुलै महिन्यामध्ये एस.के. कॉन्ट्रॅक्टर ची मुदत संपत असतांना याची जुन महिन्यामध्ये प्रक्रीया प्रशासनाने प्रशासकीय स्तरावर करायला हवी होती . त्याकडे प्रशासनाने , अधिकाऱ्यांनी जाणीवपुर्वक दुर्लक्ष केले , नगरचुकीने झाल हे झाल्यानंतर त्या वादातीत संविदा स्थायी समितीने अजेंडावर घेण्याचे सुध्दा नाकारल तो विषय मागच्या एका महासभेमध्ये सुध्दा गाजला. त्यानंतर म्हणजे एखादा हॉट टॉपीक बनतो त्यानंतर तरी संबंधित यंत्रणेने थोडस सक्रीय आणि सिरीयस असायला हव असत हि परिस्थिती आहे. पण तरीसुध्दा ते झालेले नाही. त्यानंतर खडके साहेबांकडे हा चार्ज आला . खडके साहेबांकडे चार्ज आल्यानंतर सुध्दा निविदा प्रक्रीयेच्या घोळामध्ये अजुनही ते टेंडर फिरत आहे . या सगळया गोष्टींना प्रशासन म्हणून कोण जबाबदार आपण आयुक्त म्हणून कोणावर जबाबदारी निश्चित करणार आहात.याची जबाबदारी कोण घेणार शहरात सगळया व्यवस्थेमध्ये मांडणार बांधकाम विभागात मजुर आहे ट्रॅक्टर आहे हे आणि जी कामाची दिरंगाई होते आहे. कामांचा जो खोळंबा होतो आहे.सगळया नगरसेवकांना रोषाला सामोरे जावे लागत आहे.त्याची जबाबदारी कोणावर . एक गोष्ट मला सांगायची आहे आयुक्त साहेब एक राजा असतो. त्याचा राज्य कारभार सुरळीत चालण्यासाठी काय करावे असे तो ऋषिमुनिंना विचारतो. ऋषिमुनिंनी सांगीतलेले असते की या राज्यात चांगला राज्य कारभार करण्यासाठी तू एक सोन्याची गाय घडव आणि त्याच दान कर . ती जी सोन्याची गाय आहे तर ती कश्या पध्दतीने दिली पाहीजे आणि ती १०० टक्के सोन्याचीच असली पाहीजे आणि त्यात कोणतीही भेसळ होता कामा नये. आता ज्या पध्दतीने व कुशलतेने ती घडवायची होती तर त्या कुशलतेने काय करू शकणारा कारागीर त्याला ज्ञात असतो तो सोनार , परंतू सोनार काय करतो सोनारांच्या अख्यायीका अत्यंत प्रसिध्द असतात. त्या सोनाराची एक खोट असते कामामध्ये तो हुशार असतो. तरबेज असतो सगळ निट असत परंतू त्यात एक खोट असते

तर त्याला चोरी करायची सवय असते. तर राजाला असा प्रश्न पडतो की गाय सोन्याची करायची आहे आणि या सोनाराबद्दल त्याला माहिती असते. तर त्याच्याकडुन कशी करणार. आपल्याला १०० टक्के सोन्याचीच बनवायला सांगीतली आहे. त्यामध्ये भेसळ होता कामा नये मग आता कस करायच. याच्याकडुन जर आपण काम करून टाकल तर हा भेसळ करणारच आहे. मग राजा त्याला बोलावुन घेतो व राजा त्याला सांगतो की गाय अशी अशी घडवायची आहे. मात्र हे काम तू रोज राजमहालात येवुन ईथेच पुर्ण करायचे. तर तुलाच हे काम पुर्ण करायचे आहे . तो सोनार लगेच या कामासाठी तयार होतो. राजा सुध्दा तयार होतो . तो कामाला सुरूवातही करतो . आणि त्यानंतर त्याची अस्वस्थता शिगेला पोहोचते आणि त्याला अस वाटत की त्याला त्यामध्ये त्याचा हिस्सा काढता येणार नाहीये आता काय करायचे . मग तो काय करतो की तो नामी शक्कल लढवतो की त्याच्यामध्ये त्याचा स्वभाव असतो कि आपले स्वार्थ साधणे हा जो स्वभाव असतो या स्वभाव दोषामुळे तो अशी शक्कल लढवतो की तशीच हुबेहुब गाय तो घरी तयार करतो. तशीच हुबेहुब ज्याच्या मध्ये भेसळ आहे. तो कुशल कारागीर असतो आणि त्याची भेसळ करण्याची कार्यकुशलता असतेच आणि तो जशीच्या तशी गाय घडवतो भेसळ आणि महाराजे सुध्दा ती सोन्याची गाय घडवली जाते म्हणून राजा खुप खुश असतो की आपण कुशल असलेला माणुस आहे तो व्यवस्थित हाताळतो आहे या भ्रमाखाली असतो . नंतर काय होत शेवटचा दिवस ज्यावेळी ती गाय घडवुन झालेली असते आता तो कुशल कारागीर सांगतो राजाला की आता फक्त फिनिशींग करणे बाकी आहे. त्यासाठी लागणारे सामान माझ्या घरीच आहे. ते मी इथे आणु शकत नाही. त्यासाठी मुर्तीवर शेवटचा हात फिरवणेसाठी मला मुर्ती घरीच न्यावी लागेल. मग राजाने विचार केला की आता शेवटी याला ऑप्शनच नाही व हे सगळ त्याच्याकडून करूनच घ्यायचे आहे म्हणून राजा त्याला परवानगी देतो सोनार मुर्ती घरी नेतो आणि फिनिशींग करून ती जी भेसळ युक्त गाय असते ती आणुन राजाकडे देतो राजाला लक्षात येत पण आता त्याला काय शिक्षा करायची जेणेकरून याचा स्वभाव मोडुन काढला पाहीजे .याला कायमस्वरूपी आयुष्यभर याचा त्याला त्रास झाला पाहीजे राजा त्याला सांगतो आपल्या राज्याच्या मागे जो समुद्र आहे तर त्या समुद्राच्या लाटा मोजुन घ्यायच्या किती लाटा येतात , त्या लाटा मोजुन घ्या . राजाला वाटत की मी अशी शिक्षा दिली की त्याची जन्माची खोड मुडेल आणि नंतर राजाच्या कानावर वार्ता येते की तिथे सुध्दा याने याची दुकानदारी मांडलेली आहे. राजाला हे लक्षात येते की आपण त्याला समुद्राच्या लाटा मोजण्याची शिक्षा केलेली आहे हे आयुष्यात न संपणार काम आहे. याला आयुष्यभर हे काम पुरणार आहे तरी तो खुशित आहे . तर तो तिथे काय करत असेल. राजा जेव्हा माहीती घेतो तेव्हा राजाला कळतं की समुदाच्या ज्या लाटा येता आहेत त्या तो मोजतो आहे आणि त्याने जे जहाज येत आहेत. ते जे जहाज त्याला दिसायला सुरूवात होते आणि ते त्या ठिकाण्यापर्यत जेव्हा पोहोचते. तर त्या जहाज मालकाकडून तो काही रक्कम मागतो. रक्कम तो नुकसान भरपाई मागतो तर का मागतो की मी ज्या लाटा मोजतो आहे. तर त्या लाटा मोजण्यामध्ये तुमचं जहाज यायला लागल्यापासुन मला अडथळा आला. तुमच्या जहाजामुळे माझ लाटा मोजायच चुकलं आणि पुन्हा मला लाटा मोजायला सुरूवात करावी लागली . या कामाची नुकसान भरपाई तुम्ही मला द्यावी. तरी मी आपल्या कडे सांगु ईच्छिते की याच्यातील राजा कोण याच्यातील सोनार कोण हे सगळ उघड आहे. मला वाईट वाटत आहे की एखाद्या व्यक्तीच्या रिटायरमेंट च्या दिवशी आम्हाला अस बोलाव लागत आहे. आयुक्त साहेब मी आपणाला ईथे एक सांगु ईच्छिते की, खडके साहेबांची घरकुल मध्ये आर्कीटेक्ट नियुक्ती कामी चौकशी झालेली आहे.तेव्हा सुध्दा ते शहर अभियंता होते आणि न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहुन म्हणजे सेवानिवृत्ती नंतरचे जे त्यांचे लाभ असतात हे त्यानंतरच त्यांना मिळायला हवे आहे. त्यांचा उड्डाण पदोन्नतीचा सुध्दा विषय सुध्दा डिस्पुटेडच आहे . आयुक्त साहेबांना सुध्दा मी लक्षात आणुन देवु ईच्छिते की आयुक्त म्हणुन ते फाईल आपल्याकडे येणारच आहे क्लियर करण्यासाठी अर्थातच ते प्रशासकीय अधिकार आहेत. या प्रशासकीय अधिकारांमध्ये ढवळाढवळ करण्याच पदाधिकाऱ्यांना काहीही कारण नाहीये तो आमचा उद्देशही नाही. पण जेव्हा या पध्दतीने प्रशासनातील जबाबदार अधिकारी जबाबदार पदांवर असलेले अधिकारी काम करतात आणि नगरसेवकांना त्यांचा त्रास सहन करावा लागतो . त्यामुळे माझी आपल्याला विनंती राहील आयुक्त साहेब, या सगळया गोष्टींचा उहापोह करावा आणि या सगळया गोष्टींचा विचार करूनच त्यानंतरच त्यांना त्यांच्या सेवानिवृत्ती नंतरचे ते लाभ द्यावे. सभापती म्हणुन माझी आयुक्त साहेब आपल्याला सुचना अशी आहे की आपण या सगळया विषयांचा गांभीर्याने विचार करावा. मला फक्त खडके साहेबांबद्दलच मला असे म्हणायचे आहे असे नाही ईतर सुध्दा प्रशासकीय अधिकारी सुध्दा अशीच दिरंगाई करता आहेत. या बाबतीत मी आपले लक्ष वेधत आहे चलता है. कर रहे है. हो जायेगा हि मनोवृत्ती जर बदली नाही तर आयुक्त साहेब तर हे सगळ चुकीच्या दिशेने जातय साहेब आपण प्रशासकीय प्रमुख म्हणुन येथे आहात . शेवटी या सगळयांना जबाबदार आपल्याला धरले जाणार आहे. आम्ही या ठिकाणी पदाधिकारी म्हणून काम करतो आहोत . जो पावेतो आपण हे मोडीत काढत नाहीत. तोपर्यंत जळगांव महानगरपालिकेच भविष्य अंधारातच राहाणार आहे. सभापती म्हणून माझी आजची ही शेवटची मिटींग आहे. विष्णू भाऊ , नितीनभाऊ यांनी व सगळया सदस्यांनी मला पुढील वाटचाली साठी ज्या शुभेच्छा दिलेल्या आहेत त्या सगळया शुभेच्छांचा मी आदर करते या सगळया शुभेच्छांबद्दल मी त्यांना धन्यवाद देते . सभापती म्हणून ३० ऑक्टोंबर २०१९ मध्ये स्थायी समिती सभापती म्हणून माझी

नियुक्ती झालेली होती. कार्यभार स्विकारल्यानंतर मी काही महत्वपुर्ण निर्णय येथे घेतलेले होते . स्वच्छ आणि पारदर्शी कारभाराच प्रतिक म्हणून २४ तासांच्या आंत सभेमध्ये झालेले ठराव सही करून प्रशासनाच्या सुपुर्द करणे हा त्यातला एक महत्वपुर्ण निर्णय होता आणि या मागचा उद्देशच हा होता की, प्रशासन गतीमान करायच आहे. आपले ठराव होतात व दोन दोन महिने पडुन असतात. सभा होतात निर्णय घेतले जातात पण ठरावांवर पदाधिकाऱ्यांच्या सह्या न झाल्यामुळे प्रशासनाला त्याची अंमलबजावणी करायला अडचणी येतात. त्यामुळे अत्यंत महत्वपुर्ण निर्णय घेतलेला आहे . याच्यामध्ये नगरसचिवांचे विशेष आभार मानायला हवे कारण शेवटी २४ तासांच्या आंत ठरावांवर सह्या करून देण हा निर्णय जरी मी घेतलेला असला तरी सभा संपल्यानंतर ईमिजेटली ठराव तयार करून मला सह्या करण्यासाठी सादर करणे हे खुप महत्वाच काम नगरसचिव साहेबांनी या ११ महिन्यात दरवेळेला केलेले आहे. त्याबद्दल मी विशेष आभार त्यांचे मानते. दर शुक्रवारी सुध्दा सभा घेण्याचा निर्णय मी घेतलेला होता आणि त्याप्रमाणे मार्चच्या शेवटच्या आठवड्या पर्यंत दर शुक्रवारी सभा घेतल्या. त्यानंतर कोरोनामुळे सभा बंद ठेवण्याबद्दलच जे परिपत्रक आहे त्यामुळे आपल्याला पुढच्या सभा घेतल्या नाही. तरी सुध्दा लॉकडाऊनच्या काळामध्ये सभा घेण्याबाबतचे जे परिपत्रक प्राप्त झाले आपण ईमिजेटली सभा सुरू केलेल्या होत्या. स्थायी समितीचे सभापती म्हणुन काम करतांना मला विरोधी पक्षाकडुन जे सहकार्य मिळालं ते माझ्या कार्यकाळामध्ये नमुद करण्यासारखी गोष्ट मला येथे सांगावीशी वाटते. आतापर्यंतच्या सगळया सभांमध्ये झालेले ठराव हे एकमताने झालेले आहेत. अपवाद मागच्या स्थायी समिती सभेमधील २ ठराव तर त्यातही विरोधी पक्षाचा विरोध नव्हता तर त्यांची तटस्थ ही भुमिका आहे. मला वाटत की जळगांव महानगरपालिकेच्या ईतिहासात आजपर्यंत कोणत्याही पदाधिकाऱ्यांच्या कार्यकाळात ठराव एकमताने होण अस नसाव आणि २४ तासांच्या आंत ठरावांवर सह्या करून ते प्रशासनाकडे सुपुर्द करणं अस करणारी जळगांव महानगरपालिका ही महाराष्ट्रातील एकमेव महानगरपालिका आहे. अशी माझ्याजवळ माहिती आहे. सभापती म्हणून कामकाज स्विकारल्यानंतर काही महत्वपुर्ण कामांकडे प्रशासनाचं लक्ष वेधलेल होत त्यामध्ये अर्थसंकल्प जो सादर केला त्यामध्ये अनेक नविन संकल्पना मी येथे सादर केलेल्या होत्या.अर्थातच एखादी संकल्पना ही पदाधिकाऱ्याने मांडण आणि त्यानंतर ती प्रक्रीया पुर्ण राबवुन त्याची ती संकल्पना पुर्णत्वास नेणं अर्थातच हे वर्षभरामध्ये शक्य होत नाही आणि त्यातुनही पुन्हा एकदा सांगावस वाटत की जर प्रशासन ढिम्म असेल तर त्याची अजीबात अंमलबजावणी होवु शकत नाही. अर्थसंकल्पात मी जे सादर केले होते की, शिवाजी उद्यान्यांच्या जागेवर मनपाचे जे मेहरूणचे उद्यान आहे हि भलिमोठी जागा आहे. शिवाजी उद्यानाच्या जागेवर जळगांव जिल्हा दर्शन हि एक या अर्थसंकल्पात संकल्पना मांडली होती आणि त्याच्या पहिल्या टप्प्यांच्या कामासाठी सुध्दा तरतूद करून ठेवलेली आहे. ईथला परिसर खुप मोठा आहे म्हणून बटर फ्लाय गार्डन बॉटनिकल गार्डन हे सगळ शक्य होवु शकणार आहे. म्हणुन आपण त्याची अर्थसंकल्पात तरतूद येथे केलेली आहे. आणि हे सगळे प्रस्ताव आपण B.O.T तत्वावर करू शकतो आणि हे सुध्दा प्रशासनाच्या लक्षात आणुन दिलेले आहे. मेहरूण तलाव परिसरात असलेल्या जागेवर जी जे.के. पार्कची जागा आहे त्याची मुदत संपलेली आहे. ते सुध्दा प्रशासनाच्या लक्षात आणुन दिलेले आहे की त्याची मुदत संपल्यामुळे ती जागा आपल्याला ताबडतोब ताब्यात घ्यायला हवी आहे. हि सुध्दा जागा ताब्यात घेवुन तेथेसुध्दा थिम पार्कची निर्मीती होवु शकते. जळगांव करांना कुठेतरी फिरायला जाण्यासाठी जे स्पॉट नाहीत ती कायमच ओरड असते. या पार्कची निर्मीती आपण बीओटीवर करू शकतो यामुळे होणार काय आहे की आपल्या ज्या मोठया मालमत्ता पडुन आहेत, त्याचा मुख्य विनियोग होईल त्याचा वापर होईल आणि त्यातुन मनपाला भविष्यात कायमस्वरूपी उत्पन्न मिळण्याचा स्त्रोत निर्माण होणार आहे. मनपाच्या उत्पन्नाच्या स्त्रोताबद्दल बोलायच झाल तर मनपा मालकीचा नगरपालिका असतांना एक अस्तित्वात नसलेल्या संस्थेच्या नावावर असलेला खुला भुखंड १५२०० स्के. फुटचा साधारण पणे रेडक्रॉस सोसायटीच्या बाजुला असलेला शहराच्या अतिशय मध्यवर्ती भागात असलेला हा भुखंड सुध्दा मनपाच्या ताब्यात मिळवुन देण्याकामी पाठपुरावा मी सभापती पदाच्या कार्यकाळात करून मनपाच्या सुपुर्द केलेला आहे.त्याचा सुध्दा विकास केल्यानंतर तो सुध्दा एक मनपाचा उत्पन्नाचा स्त्रोत येथे निर्माण होणार आहे.याच विषयाप्रमाणे अजून एक विषय आहे की , रिंगरोड वर जागृती महिला मंडळाला सुध्दा एक जागा मनपाने दिलेली आहे आणि ते सुध्दा मी प्रशासनाच्या लक्षात आणुन दिलेले होते आणि आता जागृती महिला मंडळ हे अस्तित्वात आहे की नाही हा सुध्दा संशोधनाचा विषय आहे आणि तेथे प्रत्यक्ष त्याचा वापर कसा सुरू आहे. तर ती जागा त्यांनी पोटभाड्याने दिलेली आहे. त्याठिकाणी ते पोटभाडेकरू ठेवुन जेडीसीसी बँकेची शाखा चालवत आहेत.प्रशासनाच्या हि बाब लक्षात आणुन दिल्यानंतर सुध्दा प्रशासनाने त्यावर अजुन काहीही कार्यवाही केलेली नाहीये. अर्थातच नगररचना विभागाला माझ्या माहिती प्रमाणे पुर्णवेळ अधिकारी नाहीयेत हे सगळयात मोठ दुर्देव आहे महानगरपालिकेच की या मोठया प्रमाणावर उत्पनाचा स्त्रोत असलेला असा एक विभाग आहे. तर या विभागामध्ये खुप चांगले बदल किंवा इतर काही योजनांबद्दल सुध्दा अर्थसंकल्पामध्ये केलेले आहे. अनधिकृत बांधकाम नियमित करून देणं , गुंठेवारीबाबतचा सुध्दा विषय मागच्या महासभेमध्ये येण अपेक्षित होता तो सुध्दा अजुन प्रशासनाकडुन आलेला नाही. ठिक आहे पण तो आता पुढच्या महासभेपुढे प्रशासनाकडून यावा असे अपेक्षित आहे. नगररचनाशी संबंधित अनेक विषय अर्थसंकल्पात मांडलेले

आहेत.एक महत्वपुर्ण विषय मी अर्थसंकल्पात मांडलेला होता की प्रभाग समिती कार्यालये जी आहेत मनपाची त्यांची रूपांतर "मिनी मनपात " करणे त्याच्या मागचा उद्देश्यच हा होता की प्रशासनाचे हात बळकट करणे. प्रशासनाचे हात बळकट झाले प्रशासन गतीमान झाले. तरच आपण हे सगळे काम करू शकणार आहे. अश्या अनेक संकल्पना प्रशासनाला सुचविलेल्या आहेत. त्याची अंमलबजावणी कशी करायची यासंदर्भात सुध्दा निर्देश दिलेले आहेत. पिंप्राळा आर्मचा एक विषय आहे जो मी माझ्या कार्यकाळात पुर्णपणे लावुन धरलेला आहे. त्या संदर्भात मी डिआरएम ऑफीसला बैठक असो किंवा डिआरएम ऑफीसची स्पॉट व्हिजीट असो नगररचना विभाग बांधकाम विभाग या सगळयांना तेथे नेणे को-ऑर्डीनेशन करणे हे सगळ केलेल आहे तर प्रशासनाने सुध्दा या पुढचा पाठपुरावा करणं आवश्यक आहे. केशवस्मृती प्रतिष्ठानच्या माध्यमातुन नेरीनाका स्मशानभुमिला गॅस दाहीनी बसविण्या संदर्भातील ठराव सुध्दा माझ्याच कार्यकाळात झालेला आहे. खरतर हे काम पुर्णत्वास गेलेल पाहीजे होत परंतू कोविडच्या संकटामुळे जशी अनेक इतर कामे अंमलबजावणी होवु शकली नाही. तसेच हे सुध्दा आता अंतिम टप्प्यात आहे.आता लवकरच आपल्याला ही गॅस दाहिनी कार्यान्वित झालेली दिसणार आहे. त्यांनतर मी महिला स्वच्छता गृहांचा मुद्दा सुध्दा मी सभागृहात मांडलेला होता. सुरूवातीपासुनच माझा तो उद्देश होता. तसेच आयुक्त साहेबांना याची संपुर्ण माहिती देते. यासाठी अनेक सामाजिक संस्था तयार आहेत. आपल्याकडे रेकॉर्डवर त्या संस्थांची यादी सुध्दा आहे. या संस्थांनी नमुद केलेल्या स्पॉट वर स्वच्छता गृह करून देण्यासाठी तयार आहे. त्याबाबतचा संपुर्ण पाठपुरावा मी केलेला आहे. यामध्ये बांधकाम विभाग ,नगररचना विभाग आणि आरोग्य विभाग या तिघा विभागांना सोबत नेवुन त्या ठिकाणी स्पॉट व्हिजीट करून जळगांव शहरातील काही स्पॉट फायनल करून घेण्यात आलेले आहेत.आणि आपले जे आर्कीटेक्ट आहेत शिरीष बर्वे त्यांच्याकडुन सुध्दा प्लॅन तयार करून घेण्यात आलेले आहेत.आता तसे जर बघितले तर लोकप्रतिनिधी म्हणून आमच्या ज्या किंवा सभापती म्हणून जी आमची जबाबदारी होती. ती स्वंयसेवी संस्थांना किंवा सामाजिक संस्थांना यात सहभागी करून घेणे याच्यासाठी आपण जळगांव महानगरपालिकेसाठी यांच्या सेवा उपलब्ध करून घेण हे आम्ही आमच्याकडून ९० टक्के पुर्ण केलेले आहे. आता पुढच काम जे आहे ते प्रशासनाचं आहे.याच्यावर पुढील अंमलबजावणी करण मी आयुक्त साहेबांना एक विनंती करते की , ज्या ज्या गोष्टी मी आता येथे मांडलेल्या आहेत. या सगळया संकल्पना आणि योजना आपण गांर्भीयाने घ्याल अशी व या संकल्पना पुर्णत्वास नेण्याकामी आपण प्रशासकीय अधिकारी म्हणून सहकार्य करावे. अर्थातच मी सभापती म्हणून मी जरी निवृत्त होत असले तरी सभागृहाची सदस्य म्हणून मी महापालिकेत राहाणारच आहे आणि या सगळयाच विषयांचा पाठपुरावा नगरसेविका म्हणून मी करणारच आहे. अजुन ज्या ज्या नविन संकल्पना माझ्या लक्षात येणार आहेत. किंवा जिथे जिथे महानगरपालिकेच नुकसान होणार आहे. म्हणजे पालिकेच्या हिताचे जे निर्णय असणार आहेत. त्या सगळया निर्णयांमध्ये प्रशासनाला १०० टक्के आमचा सपोर्ट असणार आहे. माझ्या स्थायीच्या सर्व सदस्यांच सुध्दा मी आभार मानु ईच्छिते मला सगळया सदस्यांनी माझ्या ११ महिन्यांच्या कार्यकाळात जे सहकार्य केले त्याबद्दल त्यांचे आभार आणि माझी ज्यावेळेला ३० ऑक्टोंबर ला सभापती म्हणून नियुक्ती झाली . साधारण २२ मार्च पासुन कोरोना सुरू झाला आणि असे म्हटले तरी चालेल की ५ महिन्यांचा कार्यकाळच फक्त मला काम करण्यासाठी मिळाला तरी सुध्दा मी याठिकाणी यापुढे जे कोणी सभापती येतील त्यांना माझ्या शुभेच्छा आहेतच. व नगरसचिवांचे मी विशेष आभार मानते की त्यांनी वेळोवेळी मला सहकार्य केल. प्रशासनाच व सगळया अधिकाऱ्यांचे व सगळयांचे मला सहकार्य मिळालेल आहे. प्रत्येकाने मला काहीतरी शिकविलेल आहे.आयुक्त साहेब मला येथे एक विशेष सांगावस वाटतय की, यासगळयांकडुन तर शिकलेच आहे आपल्याकडे एक विनंती मला येथे करायची आहे की, मागील महासभेमध्ये मी आपल्याला म्हटले होते की, आपल्या कार्यपध्दती मध्ये बदल अपेक्षित आहे. आपल्यावर अविश्वास प्रस्ताव आणण्याची वेळ येवु देवु नका त्यावेळी आमचे गटनेते भगतभाईंनी हे हाडाताईंच वैयक्तीक मत आहे अशी प्रतिक्रीया दिली होती. त्यांना मी अविश्वास प्रस्ताव मांडते असे वाटले होते त्यामुळे त्यांनी अशी प्रतिक्रीया दिल्याचा खुलासा त्यांनी नंतर आमच्या पार्टी मिटींग मध्ये केला होता.. आता असे आहे की भगतभाईंची मातृभाषा मराठी नसल्यामुळे कदाचित मी जे बोलली अविश्वास प्रस्ताव आणण्याची वेळ येवू देवु नका आहे त्याचा अर्थ त्यांनी त्यांच्या पध्दतीने अविश्वास प्रस्तावच मांडत आहे असा लावला होता.आणि हा गैरसमज झालेला होता त्यामुळे पुन्हा एकदा सांगते आयुक्त साहेब मी, जर प्रशासकीय यंत्रणेला तुम्ही प्रशासकीय कामकाजाची शिस्त तुम्ही लावली नाही. तर मग शेवटी मी जे मागच्या महासभेमध्ये म्हटंली होती की अविश्वास प्रस्ताव आणण्याची वेळ येवु शकते आणि अशी वेळ यावी अशी माझी अजिबात ईच्छा नाहीये. फक्त एवढे आहे की जळगांव महापालिकेचा ईतिहास आहे आमचे जळगांव महापालिकेचे दुर्देव आहे की , जे आयुक्त म्हणून रिटायर्डमेंटला जे आलेले आहेत. तेच अधिकारी येताहेत. म्हणजे जी उमेद असते ती म्हणजे तरूण अधिकारी आल्यानंतर जी उमेद असते की ते काम पुर्ण करण्याची एक उमेद असते. ती रिटायरमेंटला नसते मात्र याची दुसरी बाजु की रिटायर्डमेंटच्या एजला आपल्या जवळ अनुभव संपन्नतेची शिदोरी असते ज्याचा आम्हाला खुप मोठा फायदा होवु शकतो. अन्य महापालिकेत असेल किंवा काही बऱ्याच प्रशासकीय कार्यालयांमध्ये आपण काम केलेल आहे. तर प्रशासन कस चालवायच याचा आपल्याला असलेला अनुभव त्या तरूण अधिकाऱ्याकडे नसणार. आपल्या अनुभव

संपन्नतेचा आम्हाला फायदा करून द्या आणि जळगांव महानगरपालिका जी अंधाराकडे जाते आहे तीला आपण उजेडाकडे पुन्हा एकदा आणा . मला वाटत आता अर्थ विभागाकडुन मला माहिती मिळालेली आहे आपली आर्थिक परिस्थिती सुध्दा डबघाईकडे आलेली आहे. त्यामुळे ज्या ज्या उपाययोजना मी सुचविलेल्या होत्या त्या प्रत्यक्षात आणण्याचा आणि मनपाच्या हितासाठी याची अंमलबजावणी आपण प्रशासकीय अधिकारी म्हणून आपण करणे आपली जबाबदारी आहे.सगळयाचं सगळे अधिकारी / कर्मचारी, माझे पत्रकार बांधव , प्रिंट मिडीया , ईलेक्ट्रॉनिक मिडीया या सगळयांचे मी येथे आभार मानते. माझ्या कार्यकाळामध्ये सगळयांनीच मला जे जे काही शिकवले व जे ज्ञ ाान व सहकार्य मिळाले तर या सगळयांबद्दल मी कायमच कृतज्ञ राहणार आहे. धन्यवाद.

**मा.आयुक्त :-** आता सभापती ताईंनी जे मांडले तसेच एक विषय मा.नितीन भाऊ लढ्ढा यांनी मांडला होता . खरोखरच नितीनभाऊंसारख्या ज्येष्ठ आणि सखोलपणे काम केलेले आहे. आणि त्याबाबतीमध्ये नितीनभाऊ एवढया पोटतिडकीने विषय सभागृहात मांडतात आणि तरीही त्या विषयाची पुर्तता न होणे हे अतिशय खेदजनक आहे असे म्हणण्यास हरकत नाही. मला असे वाटते की, सदस्यांचा बोलण्याचा हेतु जो आपला आहे तो संबंधित विभागाने नोंद घेवुन व आपल प्रशासन कसं गतिमान होईल यासाठी सुध्दा प्रत्येकाने प्रयत्न करावेत.जेणेकरून सदस्यांना अश्याप्रकारे उत्तरे, आश्वासने न देता हि संवेदना व्यक्त करायची वेळ येवु नये. आपल्याकडे निधीची कमतरता आहे या बद्दल काही दुमत नाहीये. आपल्याकडे आता स्टाफ कमी आहे.परंतू जे काही आपल्या कडे उपलब्धतता आहे.त्याच्यामधुन मला आत्ताच्यापेक्षा किती गतीने आपण काम करू शकतो.आणि सभागृहातील सदस्यांनी आता जे काही प्रश्न मांडलेले आहेत. जी काही आपल्याकडे कर्मचारी संख्या जी आहे. त्यामधुन आपण यापेक्षाही निश्चितच चांगले काम चांगल्या गतीने करू शकतो. अर्थात महानगरपालिकेच्या प्रशायकीय कामकाजाची जी काही स्थिती आहे.चांगली वाईट थोडासा निधीचा प्रश्न आहे. परंतू जी काही परिस्थिती आहे ती अडचणीत आणण्यासारखी असेल. काही अधिकाऱ्याची अचानक पणे बदली केलेली असते. अनेक वर्षानुवर्ष त्या संस्थेमध्ये काम करीत असतांना जी पध्दत असते ती पध्दत आणि त्या पध्दतीत स्वत:चीही काळजी घेणे म्हणून हि स्थिती आहे म्हणून त्या संस्थेची स्थिती बदललेली आहे. अर्थात नगरसेवक असतील किंवा अधिकारी / कर्मचारी असतील हया सर्वांची हि जबाबदारी आहे की आपल्या प्रशासनामध्ये अधिक गुणवत्ता आली पाहीजे अधिक गतीमानता आली पाहीजे आणि जळगांवचा विकास व्हावा. मला अस वाटत की येणाऱ्या काळामध्ये स्थायी समितीच्या माध्यमातुन त्याच पध्दतीने कामकाज होईल.आता आज आपण आजची जी स्थायी समिती आहे. याच्यामध्ये आजचा शेवटचा दिवस आहे मा.सभापती महोदयांचा सभापती म्हणून या शेवटच्या दिवशी आपणा स्वत: सभा आयोजित केलेली आहे. एका अर्थान एक चांगला हेतु आपला आहे. प्रशासनाच्या वतीने मी मा.सभापतींच आणि आज जे स्थायी समिती सदस्य निवृत्त होताहेत त्या सर्व सदस्यांच मी मन:पुर्वक आभार व्यक्त करेन कारण आपण वेळोवेळी प्रशासनाला सहकार्य केलेल आहे.ज्या ज्या ठिकाणी आवश्यक होत प्रशासनाला मार्गदर्शन केलेल आहे. याच्यामध्ये सदस्य विरूध्द प्रशासन अस कधीच राहीलेले नाहीये आपण सगळेजण मिळुन महापालिका बघत आहोत आणि महापालिकेमध्ये ज्या ज्या ठिकाणी जो काही निर्णय घेतलेला आहे मग तो प्रशासनाचा असेल किंवा सदस्यांचा असेल तर सर्व ठिकाणी आपण प्रयत्न करणे गरजेच आहे.आणि अश्या वेळी स्थायी समिती मध्ये झालेल्या सुचना किंबहुना काहीवेळा झालेली टिका सुध्दा ती प्रशासनाला सुध्दा स्विकारली पाहीजे आणि याच्यामध्ये जो काही सुधारण्याचा भाग असेल तर तो केला पाहीजे मी या मताचा आहे. मला खेदही आहे आणि माझे सगळे सदस्य व सहकारी यापुढेही चांगल काम करतील. या स्थायी समितीने अर्थसंकल्पाच्या माध्यमातुन आज किंवा ठराव असतील नविन संकल्पना असतील. जिथे महानगरपालिकेच्या कामकाजाबद्दल ज्या काही सुचना येथे मांडलेल्या आहेत. ज्या याही वर्षामध्ये पुर्ण झालेल्या नसतील. पण येणाऱ्या काळामध्ये आपण सर्वजण ज्याकाही सुचना आपल्याला वेगवेगळया पध्दतीने समोर आणता येतील त्या आपण आणण्याचा प्रयत्न करावा.मा.सभापतींनी एक गोष्ट सांगीतली मला त्या बद्दल एवढच म्हणायच आहे की जळगांव हे शुध्द सोन्यासाठी प्रसिध्द आहे. त्यामुळे सोन्यामध्ये भेसळ करणारा कारागीर नसावा अशी आपण अपेक्षा करूया आणि तस कोणी असेल तर आतापासुन या सोन्यामध्ये भेसळ होण्याचे प्रकार बंद होतील. त्यामुळे त्या कारागीरवर वचक ठेवण्याचे काम आपल्या याच्यात कुणी राजा नाही. परंतू प्रशासनाचा विश्वास आहे. त्या विश्वासाच्या भुमिकेमधुन आपण आपल्या कारभाराच जे सोने आहे ते शुध्दच राहील. या दृष्टीने आपण बघुयात . सभापती महोदयांनी प्रशासनावर आयुक्तांवर जी अविश्वासाची भुमिका जी मांडुन दाखवली मला त्या विषयावर जास्त काही बोलायच नाही.पुर्ण सभागृहाचा, सन्मा.सदस्यांचा तो मुळ अधिकार आहे. तर ते त्यांच्या अधिकाराचा वापर केला तर त्या बद्दल कुणाच्या मनामध्ये असे काही येणार नाही.परंतू प्रशासन म्हणून मला एक निश्चितच सांगायचे आहे की, कोणीही आयुक्त असतील या या मागचे असतील किंवा पुढे येणारे असतील असे प्रत्येक जण प्रशासनाला गती देण्याचे दृष्टीकोणाने चांगले काम होईल अश्या दृष्टीने काम व्हायला पाहिजे. तो नविन येणारा असेल किंवा सेवानिवृत्त होणारा असेल. यांची माणसिकता पहिल्या दिवसापासुन शेवटचे दिवसापर्यंत आपल्याला मिळालेल्या सेवेच्या संधीचा प्रशासनाला जास्तीत जास्त कसा उपयोग करुन देता येईल याच पध्दतीने करत असतो. त्यामुळे मला वाटत, अधिकारी सेवानिवृत्त होत आहे किंवा तो सेवेमध्ये नुकताच आलेला असेल, प्रत्येक

अधिकाऱ्याची कार्यपध्दती व कार्यक्षमता आहे परंतु हेतु मात्र एकच आहे आपल्याला दिलेल काम हे जलद आणि लवकर कसे करता येईल लोकप्रतिनिधींना सहकार्य कसा करता येईल. आपल्या मर्यादेनुसार आपण जास्तीत जास्त काम कस करु शकतो. यापुढे प्रशासन याच पध्दतीने प्रशासन पुढे निश्चितपणे काम करेल. मी पुन्हा एकदा मा.सभापतींच आणि आजच्या सभेमधुन स्थायी समितीमधुन सेवानिवृत्त होणारे आपले सन्मा.सदस्यांच आभार व्यक्त करतो आणि आपण केलेल्या कामांबद्दल त्यांच अभिनंदन करतो. येणारी स्थायी समिती सुध्दा प्रशासनाला अशीच सहकार्य करत राहील अशी अपेक्षा करतो. मला बोलण्याची संधी दिली त्यामुळे सभापती मॅडम यांचे आभार व्यक्त करतो.

**:-** स्थायी समिती के टाईमसे हमने एक काम मांगा है, आठ नऊ महिने हो गये, एक काम मांगा है रु.६लाख का. वो ६ लाखका काम ये टेबल वो टेबल, प्रत्येक्ष खडके साहब को लेकर गए.

**मा.सभापती :-** हाजी साहब, हो जाऐंगा आपका काम.

**:-** अगर आपने हमारा ६ लाख का काम करा तो हम समझेंगे ६०० करोडका काम पास हुआ.

**मा.आयुक्त :-** फाईल मंगवाई है हो जाऐंगा काम.

**नगरसचिव :-** मा.सभापती यांनी मला बोलण्याची संधी दिली मी त्यांचा आभारी आहे. अधिनियमातील तरतुदीनुसार प्रत्येक वर्षात आठ सन्मा.सदस्य निवृत्त होतात. सभा कामकाज करतांना मला स्थायी समिती मध्ये आदरणीय सभापती महोदया आणि सन्मा.सदस्य यांनी खुप सहकार्य केले एक परिवार समजुन या सभेच कामकाज या वर्ष भरात पार पडले, मी सर्व सन्मा.सदस्य आणि मा. सभापती महोदया यांचे मी आभारी आहे की, यांनी मला सभा कामकाज करतांना एवढ चांगल सहकार्य केल त्या बद्दल त्यांचे आभार धन्यवाद.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. २८४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, जळगांव शहरात तसेच संपुर्ण देशात कोरोना कोविड-१९ या आजाराचा प्रादुर्भाव मोठया प्रमाणात वाढलेला आहे व त्याचा प्रसार रोखण्यासाठी कोरोना प्रतिबंधित फवारणी करणे अत्यंत गरजेचे आहे त्याच प्रमाणे सध्या पावसाळा सुरु झाला असल्याने शहरात पावसाच्या पाण्याने डबके, गटारी, तळी, कारंजे, इमारती वरील टाक्यात पावसाचे पाणी साठून डासांची उत्पत्ती वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. डासांची उत्पत्ती वाढल्यास शहरात हिवताप, डेंग्यु, मलेरीया, चिकनगुनिया या आजाराचे प्रमाण वाढत असते. त्यास प्रतिबंधात्मक उपाय योजना करणे गरजेचे असल्याने त्या ठिकाणी अळीनाशक औषधीची फवारणी करणे तसेच घरोघरी जावून पाण्याचे कंटेनर, हौद, टाक्या, कुलर यातील पाण्यात अबेट टाकणे आवश्यक आहे. तसेच मोठी डबके, कारंजे यात गप्पी मासे सोडणे आवश्यक आहे व डेंग्यु, मलेरीया सदृश्य रुग्ण आढळून आलेल्या परिसरात धुर फवारणी करणे आवश्यक आहे. हा सर्व कार्यक्रम शहरात राबवणे करीता १९५ कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे. सध्या मलेरीया विभागात आस्थापना सुचिवर कायम फवारणी कर्मचारी ३९ व मोकादम ७ असे एकूण ४६ कर्मचारी असून कोरोना प्रतिबंध फवारणी करीता डेंग्यु मलेरीया प्रतिबंध फवारणी करीता १४९ कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे. आतापर्यंत मनपा मधील विविध विभागातील कर्मचारी यांचेकडून जळगांव शहरात वरील कार्यक्रम राबविण्यात येत होता परंतु सध्या शहरातील कोविड-१९ चे प्रादुर्भाव वाढल्यामुळे सदर कोविड-१९ वर प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी मनपा मधील विविध विभागातील कर्मचारी कार्यान्वीत आहेत. त्यामुळे वरील कार्यक्रम राबविणेसाठी मनपा आस्थापनेवरील कर्मचारी उपलब्ध करुन देण्याबाबत आस्थापना विभागाने असमर्थतता दर्शविली आहे.

त्या अनुषंगाने जळगांव शहरात सध्या कोरोनाचा प्रादुर्भाव वाढत असून सोबत डेंग्यु, मलेरीया, चिकनगुनिया इ. आजारांचा प्रादुर्भाव वाढू नये यासाठी तातडीची बाब म्हणून यापूर्वी प्रसिध्द केलेली ई-निविदा क्र.४० मधील एल-१ निविदाधारक मे.दिपक उत्तराधी अमरावती यांचे प्रति कामगार सेवा शुल्क रु.०.०१/- या दरास (मनपाने ठरविलेले किमान वेतन दर रु.५२९/- प्राप्त सेवा कर रु.०.०१/- असे एकूण रु.५२९.०१/- प्रति दिन प्रति कामगार) स्थायी समिती सभा ठराव क्र.२६६ दि.२५/०८/२०२० अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे.

सदरचे काम माहे डिसेंबर पर्यंत (३ महिने) मे.दिपक उत्तराधी, अमरावती यांचेकडून खाली नमूद केलेनूसार करुन घेणे कामी येणारा एकूण खर्च रक्कम रु.७०,९४,०२४/- मात्रला मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| कामगाराचा किमान वेतन दर | मक्तेदाराचा सेवाकर | एकूण रुपये | दैनंदिन कामगार संख्या | प्रति दिन खर्च | प्रतीमहा खर्च | ३ महिन्यांचा खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| रु.५२९/- | रु.०.०१/- (१पैसा) | रु.५२९.०१/- | १४९/- | रु.७८,८२२/- | रु.२३,६४,६७४/- | रु.७०,९४,०२४/- |

तसेच सदरचा खर्च हा संसर्गजन्य रोगांचे नियंत्रण व उपाययोजना या लेखाशिर्षकातुन करणे तसेच मक्तेदार यांचेशी करारनामा करुन कार्यादेश देणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३ (ड) नुसार संविदा करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे. मात्र प्रस्तावानुसार चे काम प्रत्यक्षात होणेबाबत १००% अंमलबजावणी कामी प्रशासनाने दक्ष रहावे व संबंधीत विभागाने काम करणाऱ्या यंत्रणेवर नियंत्रण ठेवावे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १२ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- पाटील राजेंद्र झिपरु**

**अनुमोदक :- सनकत चेतन गणेश**

**मा.सभापती:-** सभा संपलेली असल्याने नगरसचिव यांनी राष्ट्रगीत सुरु करावे.
राष्ट्रगीत झाल्यानंतर सभा संपन्न झाली.

**सही/-**
**सभापती**
**जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव**